# प्रकरण तिसरे

# सोलापूर जिल्ह्यातील विष्णूमूर्ती

## सोलापूर जिल्ह्यातील विष्णूमूर्ती ----------

**वराहमूर्ती - अवतार मूर्ती - जुना राजवाडा परिसर ,अक्कलकोट.**

श्री स्वामी समर्थाच्या वास्तव्याने पावन झालेली प्रज्ञापुरी म्हणजेच ही अक्कलकोट नगरी; अक्कलकोट हे संस्थान होते. या संस्थानाला आठव्या शतकापासून ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. येथे विविध संप्रदायांनी भक्तीचा डोंगर उभा केला त्यात दत्त संप्रदायाची महती अधिक आहे . श्री स्वामी समर्थ दत्तात्रयांचे अवतार म्हणून ओळखले जातात. एक तीर्थक्षेत्र म्हणून अक्कलकोटची ख्याती वाढतच आहे. या तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी श्री समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेली अनेक धार्मिक स्थळे ऐतिहासिक वास्तू आजही उभ्या आहेत.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूराजांची बंदिवासातून मुक्तता झाली. शाहू राजे परतत असताना औरंगाबादजवळ पारद गावी झालेल्या लढाईत तेथील पाटील घराण्याचा नि:पात झाला ,त्या घराण्यातील राहिलेले एकमेव वारसदार छोटे मूल दत्तक घेतले त्यांचे संगोपन केले व पुढे त्याला अक्कलकोटची जहागिरी दिली . तिथून भोसले घराणे सुरु झाले . आजही या घराण्याचे दोन राजवाडे शहरात उभे आहे. या राजवाडयाच्या परिसरात काही मूर्ती आहेत. बहुधा त्या जेऊरहून आणल्या असाव्यात असे सांगतात.जेऊरच्या काशी विश्वेश्वराच्या मंदिरातही काही मूर्ती आहेतच. त्या मूर्तीतही विष्णू अवताराच्या मूर्ती आहेतच त्या जितक्या प्राचीन आहेत तितक्याच या राजवाडयाच्या परिसरातील मूर्तीही प्राचीन आहेत. काही मूर्ती नवीन राजवाडयाच्या परिसरात ,तर काही मूर्ती जुन्या राजवाडयाच्या परिसरात आहेत.



वराह हा भगवान विष्णूंचा अवतार. हिरण्याक्ष राक्षसाने पृथ्वीचे हरण करुन तिला पाताळात नेले होते. पृथ्वीला पाताळातून वर आणण्यासाठी भगवान विष्णूंनी वराहाचा अवतार घेतला होता. वराह मूर्तीचेही काही प्रकार पडलेले आहेत. त्यापैकी नृवराह या प्रकारातील ही मूर्ती आहे. यालाच आदिवराह भूवराह असेही म्हणतात. या मूर्तीत फक्त तोंड वराहाचे व संपूर्ण शरीर माणसाचे असते ही मूर्ती ४६"उंच असून रुंदी

२८"आहे. ही वराह मूर्ती पाठशिळा युक्त आहे.मूर्ती अतिशय सुबक आहे. ही विष्णू मूर्ती चतुर्भूज असून आलीढ मुद्रेत उभी आहे हातात प्रदक्षिणा मार्ग क्रमाने उजव्या हातात गदा आहे मागच्या उजव्या हातात चक्र आहे. तिसरा मागचा डावा हात वरती केलेला आहे हातात आयुध नसले तरी या हातावर श्री विष्णूनीं भूदेवीला सावरले आहे. येथे पृथ्वी स्त्री रुपींणी दाखविली आहे. खर तर वराह अवतारात विष्णूंनी पृथ्वीला दातांच्या सुळयावर तोलले आहे. परंतु या मूर्तीत पृथ्वी हातावर बसलेली आहे. चौथ्या डाव्या हातात शंख आहे हातातील वामावर्ती शंखाला बोटात धरलेला आहे. तर्जनी , अनामिका व मधले बोट यांनी हा शंख पकडलेला आहे .पाय आलीढ मुद्रेत असल्यामुळे डावा पाय उचलेला आहे. या पायाच्या मांडीवर शंख टेकविला आहे. उजवा पाय जमिनीवर टेकविलेला आहे. डाव्या उचलेल्या पायाखाली हिरण्याक्षाला भगवान विष्णूनी पाताळात पाठविले आहे. मूर्तीत तोंड वराहाचे आहे त्यामुळे दाताचे सुळे व कान दिसतात संपूर्ण मूर्ती अलंकृत आहे. डोक्यावर बारीक कलाकुसर असलेला निमुळता होत जाणारा मुकुट आहे. गळयात आपादलम्बिनी माला आहे. त्या खेरीज गळयात हारयष्टी आहे बाहूवर सारवळया आहेत .दंडावर केयूर आहेत. पोटावर उदर बंध आहे .गळयात हेमसूत्र म्हणजे यज्ञोपवीत आहे कमरेला कमर बंध तसेच मेखला आहे.पायात सुवर्ण साखळया आहेत व तोडे , पैंजण म्हणजे तोरडया आहेत. हातात तोडे आहेत पायाशी उजव्या हातात नमस्कार मुद्रेत मानवी आकृती आहे. मूर्ती वैशिष्टपूर्ण असून अतिशय सुबक आहे. ही मूर्ती प्राचीन असावी असे वाटते.

**विदरण नरसिंह- अवतार मूर्ती - जुना राजवाडा परिसर , अक्कलकोट.**

श्री विष्णूंना आपल्या प्रल्हाद या भक्तासाठी हा अवतार घ्यावा लागला . नरसिंह हे विष्णूचे उग्र रुप आहे. काही ठिकाणी ते सौम्यही दाखवितात. या मूर्तीतील हे विष्णूचे उग्र स्वरुपच आहे. हिरण्यकश्यपूचे पोट फाडताना दाखविलेला आहे. हिरण्यकश्यपूला मांडीवर घेऊन त्याचे पोट फाडणारी सिंहमुखी पण मानवधारी मूर्तीला ' विदरण नरसिंह' असे म्हणतात. ही मूर्ती याच प्रकारातील आहे मुर्तीची उंची ४८" असून रुंदी ३०" आहे. काळया पाषाणात घडविलेली ही मूर्ती आहे. मूर्ती उघडयावर असल्यामुळे उन्हा पावसाचा , हवामानाचा, त्या



पाषाणावर परिणाम झालेला दिसतो. ही मूर्ती पाठशिला युक्त आहे. या ठिकाणी षष्ठभूज नरसिंह आहे. ही आसन मूर्ती आहे . श्री विष्णू ललितासनात बसलेले आहेत . उजवा पाय लोंबता सोडून डाव्या पायाची मांडी घातलेली आहे. मांडीवर हिरण्यकश्यपूला घेतलेले आहे. उजव्या हातात हिरण्यकश्यपूचा पाय धरलेला आहे. डावा हात त्याच्या पोटा जवळ आहे. उजवा वरचा हात आणि डाव्या बाजूच्या वरच्या हाताने हिरण्यकश्यपूच्या आतडया बाहेर काढलेल्या आहेत. उजव्या बाजूचा वरचा हात किरीटाकडे वर झालेला आहे. डाव्या बाजूचा सहावा हात टेकविलेला आहे. यातील तीन हात थोडे भग्न झालेले आहेत. हिरण्यकश्यपूही किरीटासह अलंकृत दाखविलेला आहे. श्री विष्णूंच्याही पायात तोडे आहेत हातात तोडे व बाहूभूषणे आहेत. गळयात हारयष्टी व जानवे आहे. डोक्यावर विशिष्ट प्रकारचा किरीट आहे आणि मूर्तीचा चेहरा अतिशय रौद्र आहे जबडा उघडलेला आहे पायाशी शिळेवर दोन्ही बाजूस मुकुटधारी मानवी आकृती नमस्कार मुद्रेत आहेत पैकी उजव्या बाजुची गुडघ्यावर बसलेली आहे तर डाव्याबाजूची उभी आहे. डाव्या पायाखाली एक आकृती पूर्णतः उताणी नमस्कार करताना दिसते ही मूर्तीही प्राचीन मूर्तीत गणना होणारी मूर्ती आहे.

**राम सीता मूर्ती -अवतार मूर्ती - राम गल्ली , अक्कलकोट.**



आज स्वामी समर्थ हे जरी अक्कलकोटचे ग्रामदैवत असले तरी प्रत्यक्ष स्वामी महाराज जेव्हा गावात होते त्या वेळेला अक्कलकोटचे ग्रामदैवत म्हणजे हे राम मंदिर होते कारण प्रत्यक्ष स्वामी महाराजांची तिथे बैठक असे. या मंदिरातील मूर्ती मध्ययुगीन कालखंडातील वाटते, ही आसन मूर्ती आहे . कमरेएवढया पीठावर बसविलेली आहे. ही राममूर्ती अतिशय वैशिष्ट पूर्ण वाटते. ही राममूर्ती संगमरवरात घडविलेली आहे. या मूर्तीवर दक्षिणात्य पध्दतीची छाप वाटते. मूर्ती पाठशिला युक्त म्हणता

येणार नाही कारण मूर्तीच्या मागचा भाग ही कोरीव आहे . मूर्तीच्या वरती नक्षीदार महीरप आहे. महीरपीच्या मध्यभागी कीर्तिमुख आहे आणि कडेला पक्षी कोरलेले आहेत. श्रीराम सुखासनात आसनस्थ आहेत श्रीरामाची ही व्दिभूज मूर्ती आहे. डाव्या मांडीवर सीता भद्रासनात बसली आहे. सीतेचे हात नमस्कार मुद्रेत आहेत. श्री रामांचा डावा हात सीतेच्या कमरेभोवती आहे व उजवा हात उजव्या गुडघ्यावर टेकविलेला आहे. अंगावर फारसे अलंकार नाहीत परंन्तु प्रत्यक्ष मूर्तीच अतिशय रेखीव वाटते डोक्यावर किरीट आहे. त्याला त्रिश्रृंग असल्या प्रमाणे दिसतात पण प्रत्यक्ष नाहीत कारण ते किरीटाचे नक्षीकाम आहे. कानात लोंबणारी कुंडले आहेत. तर गळयात भव्य हारयष्टी आहे. मुर्ती अधोवस्त्र आहे. सीतेने साडी परीधान केली आहे. दोन्ही बाजुला उभ्या प्रतिमा आहेत. त्या लक्ष्मण , भरत शत्रुघ्न व मारुती यांच्या आहेत. आसनाच्या खाली ज्या छोटया प्रतिमा आहेत त्या जांबुवान, सुग्रीव , नीळ इत्यादीच्या आहेत. सर्वच प्रतिमा अधोवस्त्र आहेत . डोळयावर किरीट आहेत. समपाद अवस्थेत उभ्या आहेत.

**राम लक्ष्मण सीता मूर्ती - अवतार मूर्ती-राजेराय मठाजवळ, अक्कलकोट.**



हे मंदिर अतिशय जुने आहे. हेमाड पध्दतीचे बांधकाम आहे. काळया दगडामध्ये हे मंदिर बांधलेले आहे. समोर विहिर आहे ही विहिरही त्या काळातीलच असावी अलीकडे जवळच राजेराय मठ झालेला आहे. राम मंदिर कुणी बांधले कधी बांधले याचा सुगावा लागत नाही. मूर्तीची पूजा खाजगी पुजा-यांकडे आहे . त्यांना बदल्यात वेतन म्हणून शेती आहे, ती त्यांच्या वाडवडीलांपासून आहे असे ते सांगतात. त्यावरुन मंदिर प्राचीन असावे असे वाटते. या खेरीज प्रत्यक्ष जी मूर्ती आहे ती पूर्ण स्वरुपात आहे. परंन्तु इतकी झिजलेली आहे की ते राम ,लक्ष्मण,सीता आहेत हे माहित आहेत , म्हणूनच ओळखता येतात . ही मूर्ती एका लांबट पाठशिळेवर घडविलेली आहे . हात ,मान या जवळ दगडात थोडया पोकळया दिसतात बाकी मूर्ती अर्ध उठावात घडविलेली आहे . या मूर्तीत श्रीराम सुखासनात

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

बसलेले आहेत. मूर्ती व्दिभूज आहे. उजवा हात अभय मुद्रेत आहे. डाव्या मांडीवर सीता बसलेली आहे त्यामुळे श्रीरामाचा डावा हात सीतेच्या कमरेवर आहे . सीता बसली तरी उभीच असल्यासारखी वाटते तिचा हात खाली सोडलेला आहे. उजवा हात थोडा वर असलेला आहे बंहुधा हातात कमळ असावे मुर्तीची झीज झालेली असल्यामुळे नीट कळत नाही. लक्ष्मण समपाद अवस्थेत उभा आहे. त्याच्या डाव्या हातात धनुष्य आहे. उजवा हात खाली सोडलेला आहे. खूप बारकाईने पाहिल्यावर राम , लक्ष्मणांच्या डोक्यावर मुकुट दिसतात. एकंदरीत मूर्तीचा पाषाण अतिशय झिजलेला आहे व पूजा द्रव्यामुळे पांढरट पडलेला आहे. दागिन्यांचे अंकन पूर्णपणे झिजून गेले आहे. ही मूर्ती प्राचीन मूर्ती प्रकारात मोडणारी मूर्ती आहे.

**विष्णूमूर्ती - निजरुपमूर्ती - गणेश मंदिर ,अक्कलकोट.**

अक्कलकोट मधील ऐतिहासिक काळातील हे गणेश मंदिर आहे. हेमाडपंथी मंदिरात पूर्वी मोठा सभामंडप होता तो आता कोसळला आहे. या दगडी मंदिरात गणेश पंचायतन आहे, त्यामुळे विष्णूची अतिशय सुंदर अशी दगडी मूर्ती आहे. ही मूर्ती १४" उंच असून तिची रुंदी ९" आहे. मूर्ती छोटीशीच असल्यामुळे जास्तच सुबक आहे. ही निजरुप विष्णूमूर्ती आहे .मूर्ती पाठशिला युक्त म्हणता येत नाही कारण संपूर्ण पाठीचेही अंकन केलेले आहे . मागे नक्षीदार महीरप आहे. मध्यभागी कीर्तिमुख आहे. या छोंटयाशा पीठावर समपाद अवस्थेत उभी असलेली चतुर्भूज विष्णूची निजमूर्ती आहे. हातातील आयुधाच्या क्रमानुसार चोवीस अवतारातील विष्णू अवतारात ही मूर्ती मोंडते. प्रदक्षिणा क्रमाने उजव्या हातात गदा, मागच्या हातात चक्र असा आयुधांचा क्रम आहे. अंगावर भरपूर अलंकरणे आहेत. पायात तोडे तसेच पैंजण आहेत. हातात तोडे आहेत. दंडावर बाजुबंद, खांदयावर बाहुभुषणे, गळयात अपादलम्बिनी वनमाला , हारयष्टी, डोक्यावर निमुळता होत जाणारा नक्षीकाम असलेला किरीट आणि कानात कर्णभूषणे अशी अलंकरणे आहेत.



मूर्ती व्यवस्थित पूर्णावस्थेत आहे. त्यामुळे ही विष्णूमूर्ती विलोभनीय वाटते. मूर्ती फार जुनी नसली तरी ऐतिहासिक काळातील आहे, कारण त्या काळी अक्कलकोट नरेशांकडून हे मंदिर स्थापन झाले असावे.

**परशुराम - अवतार मूर्ती - गुरुमंदिर, अक्कलकोट.**



अक्कलकोटमध्ये गजानन महाराजांचे मंदिर गुरुमंदिर या नावाने ओळखले जाते हे मंदिर फारसे जुने नाही फार तर १५० वर्षा पुर्वीचे असेल . या मंदिरात मूळ मूर्ती स्वामी महाराजांचीच आहे. परंतु त्या ठिकाणी पूजेंच्या आणखीही मूर्ती आहेत. त्यात ही परशुरामाची मूर्ती आहे. ही मूर्ती अलीकडच्याच काळातील आहे. मूर्ती आकाराने छोटी आहे. तसेच उत्सव मूर्ती जशा धातूच्या असतात तशा प्रकारे ती धातूची आहे. ही परशुरामाची मूर्ती अतिशय सुबक व कोरीव आहे. उजव्या हातात परशू घेतलेला आहे आणि डावा हात खाली सोडलेला आहे. परशुवरची पकड नाजूक आहे. परशुरामांच्या चेह-यावरचे भाव सौम्य आहेत. डोक्यावर नक्षीकाम केलेला किरीट , कानात कुंडले , गळयात एकावली यज्ञोपवीत आहे. हातात तोडे आहेत . दोन्ही खांदयावरुन खाली आलेल्या शालीचे सुरेख अंकन केले आहे. परशुरामाच्या मूर्ती क्वचितच सापडतात. त्यामुळे ही अलीकडच्या काळातील असली तरी वैशिष्टयपूर्ण अशी मूर्ती आहे.

**हरिहर - असाधारण मूर्ती - नविन राजवाडा परिसर , अक्कलकोट.**



नवा राजवाडा परिसरातील हरिहराची ही वैशिष्टयपूर्ण मूर्ती आहे. मूर्ती पाठशिळायुक्त आहे. मूर्तीचा पाषाण हा पुरुंदासारखा आहे. पण पुरुंद नाही. आभंगावस्थेतील हरिहराची ही स्थानक मूर्ती आहे. या मूर्तीचे वैशिष्टय म्हणजे मूर्तीच्या मागील हातामध्ये शंकराची आयुधे आहेत, तर साधारण हात श्री विष्णुंचे आहेत. प्रदक्षिणा क्रमाने उजवा हात अभय मुद्रेत आहेत. मागील उजव्या हातात नररुंड आहे, तर तिस-या म्हणजे मागील डाव्या हातात डमरु आहे, चौथ्या म्हणजे डाव्या

हातात गदा आहे. परंतु ही गदा उजव्या पायाकडे टेकविलेली आहे. अंगावर शिवाची व विष्णूची अंलकरणे आहेत. दोन्ही बाजूला चामरधारिणी आहेत. पाठशिळा मूर्तीच्या डोक्यामागे थोडीशी उंच आहे. पाठशिळेवर नक्षीदार पट्टी आहे. पाय अर्धसम अवस्थेत आहेत. पायात तोडे दिसतात. अर्धे अंग शिवाचे व अर्धे अंग विष्णूचे असा भेद या मूर्तीत नाही. आयुधावरुनच हा हरिहर ओळखता येतो. त्यामुळे अलंकरणे विष्णूचीच दिसतात.

**शेषशायी विष्णू मूर्ती - असाधारण मूर्ती - जेऊर, ता. अक्कलकोट.**

अक्कलकोट पासून १० कि.मी. अंतरावर असलेले जेऊर हे गाव आहे. ऐतिहासिक काळात जिन्नानगर म्हणून ओळखले जाणारे हे गांव . या गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. ती अशी ---

इ.सना प्रारंभी अक्कलकोट परगणा पैठणच्या सातकर्णीच्या अधिपत्याखाली होता. पुढे दहाव्या शतकात राष्ट्रकुटांनी चालुक्यांच्या नाश करुन राज्य स्थापले, पण पुढे बाराव्या शतकात चालुक्यांचे राज्य संपले . नंतरचा कालखंड कलचुरींचा आढळतो. या काळात लिंगायत पंथ वाढीस लागलेला दिसतो कारण , त्या काळचे म्हणजे बाराव्या शतकातील जैन पध्दतीची छाप असलेले एक शिव मंदिर आढळते ते म्हणजेच जेऊरचे काशीविश्वेश्वराचे मंदिर होय बाराव्या शतकाच्या शेवटी देवगिरीच्या यादवांनी कलचुरींना पराभूत केले आणि दक्षिण भारतात आपले राज्य प्रस्थापित केले. जवळ जवळ दोन शतके देवगिरीच्या यादवांचे राज्य होते येथील परिसरातील कडबगांव , नागणसूर ,जेऊर येथे यादवकालीन अवशेष मिळतात . तेराव्या शतकातील हेमाडपंथी पध्दतीच्या वास्तुव्दारे यादवांचे अस्तिव आढळते. यादवकाळामध्ये विष्णूपूजा अस्तिवात असावी . हे राजे विष्णूभक्त असावेत आणि विष्णू अवतारांची कल्पनाही या वेळी रुढ झालेली असावी, कारण काशिविश्वेश्वर मंदिरातच विष्णूचेही शेषशायी या असाधारण रुपातील मंदिर आहे. तसेच मंदिराच्या आवारात असलेली जी चिरेबंदी आणि प्रशस्त अशी विहिर आहे, त्या विहिरीत एका मोठया कोनाडयात शेषशायी विष्णूंची मूर्ती आहे. ही मूर्ती आजही चांगल्या अवस्थेत आहे. या दोन्हीही मूर्ती एकाच वेळच्या असाव्यात आणि साधारण बाराव्या शतकातील असाव्यात .

प्रत्यक्ष विष्णूमूर्तीचा विचार करताना एक उत्तम कलाकृती म्हणून या मंदिरातील विष्णूमूर्तीकडे पहावे लागेल. ही विष्णूची शयनमूर्ती असून काळया पाषाणातून घडविलेली आहे. परंतु नित्यपूजेतील द्रव्यांचा परिणाम होऊन हा



पाषाण थोडा झिजल्यासारखा आहे. व त्यामुळे एक प्रकारचा पांढरटपणा दिसतो. ही विष्णूमूर्ती पाठशिळायुक्त आहे . या प्रतिमेची उंची ३०" असून रुंदी ४८" आहे . मूर्तीशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने ही विष्णूमूर्ती महत्वपूर्ण वाटते. भगवान विष्णू शेषावर पहूडलेले आहेत. डोक्याच्या वरती सप्तफण्याच्या शेषाचा फणा उभा आहे आणि शेषाचे वेटोळे अंगाखालून गेलेले आहे. ही विष्णू मूर्ती चतुर्भूज आहे. हातांचा विचार प्रदक्षिणा क्रमाने केला तर खालचा उजवा साधारण हात हदयावर ठेवलेला आहे.छातीवर श्रीवत्सचिन्ह असावे परंतु ते स्पष्ट दिसत नाही. हदयावरील हाताचा अंगठा व तर्जनी यांची अग्रे जूळवून बाकीची बोटे पोकळी सोडून तळहात हदयाशी धरलेला आहे. म्हणजे तो ज्ञान मृद्रेत आहे. हाताचा थोडया खाली शंख ठेवलेला आहे. कदाचित या हातातील ते आयुध असावे . दुसरा उजवा सधारण हात वर करुन त्या हाताने डोक्याला आधार दिलेला आहे. डोक्यावर किरीट मुकुट आहे. मुकुटावरच हात टेकलेला आहे. हातातील आयुध गदा खाली उशाशी ठेवलेली आहे. तिसरा म्हणजे डावा हात उद्‌बाहू आहे. हा हात वरती थोडा खंडीत झालेला आहे, त्यामूळे हातात चक्र आहे की कमळ आहे हे नक्की कळत नाही. विहिरीतीलही मूर्ती अशाच प्रकारची शेषशायीच आहे. त्या विष्णूमूर्तीच्या हातातील चक्र स्पष्ट दिसते. जर हया मूर्ती समकालीन असतील तर हातात चक्रच असावे. चौधा म्हणजे साधारण डावा हात प्रलम्बबाहू आहे. हा हात निरायुध असून तो मांडीवर टेकविलेला आहे.

उजवा पाय सरळ असून तो लक्ष्मीचा मांडीवर टेकविलेला आहे. डावा पाय उचलून उजव्या पायावर ठेवलेला आहे. उजवा पायावर वस्त्राचा सोगा लोंबताना दिसतो. डाव्यापायाशी एक मानवी आकृती आहे, ती कशाची असावी याचा अंदाज लागत नाही. पायाशी श्री लक्ष्मी

सुखासनात बसली आहे. डावा पाय मांडी घालून उजवा पाय खाली सोडलेला आहे. लक्ष्मीचे दोन्ही हात श्री विष्णूंचे पाय चुरीत आहेत . लक्ष्मीच्या डोक्यावर मुकुट नाही कानात तांटक चक्र आहेत . गळयात गळसरी पायात मोठाले तोडे दिसतात. लक्ष्मीच्या जवळ श्री विष्णूंच्या शेजारी एक मानवी आकृती हात जोडून उभी आहे. तिच्या डोक्यावर मुकुट असून अंगावर अलंकरणे आहेत. श्री विष्णूंच्या डोक्यावर निमूळता होत जाणारा मुकुट आहे. कानात तांटक चक्र आहेत. गळयात पुष्कळ अलंकरणे दिसतात. त्यात गळसरी आहे . ग्रैवेयक म्हणजे जानवे आहे .दंडावर केयूर ,बाजूबंद आहेत.हातात व पायातही तोडे आहेत. कंमरेला मेखला आहे.या असाधारण शयन मूर्तीच्या नाभीतून कमळ निघाले आहे. या कमळावर ब्रम्हदेव आसनस्थ झालेले आहेत. ब्रम्हदेवाची मूर्ती एकमुखी आणि चतुर्भूज आहे.

या विष्णू मूर्तीचे विशेष म्हणजे या आडव्या शयन मूर्तीवर एक कोरीव महीरप आहे.पाठशिळेच्या वरच्या मधल्या टोकावरील अलंकरण म्हणजे कीर्तिमुख आहे. ही महीरप मूर्तीतीलच एक भाग वाटते . महीरपीच्या वरती कीर्तिमुखाच्या उजव्या बाजूला तीन व डाव्या बाजूला तीन असे सहा गोलाकार भाग आहेत. या सहा गोलामध्ये काही आकृती आहेत. त्या अवतार मूर्ती आहेत की काय ते समजत नाहीत. डाव्या बाजूस शेवटच्या गोलाखाली एक छोटी मानवी आकृती दिसते . तिच्या खाली लक्ष्मीच्या डोक्यामागे एक माणूस अश्वावर स्वार दिसतो. पहिल्या गोलात हत्ती दिसतो. दुस-या गोलात एक आसन मूर्ती आहे. वरच्या हातात गदा ,चक्र आहे. चेह-याच्या ठेवणीवरुन तो नरसिंह वाटतो . तिस-या गोलातील मूर्तीही आसनस्थ आहे. हातात खड्ग दिसते. चौथ्या व पाचव्या गोलातही अशाच मूर्ती आहेत. सहाव्या गोलातील मूर्ती चतुर्भूज आहे. कदाचित त्या काळात सात अवतारांची कल्पना रुढ असावी असा विचार केला तर सहा गोला व्यतिरिक्त अश्वावर स्वार असणारा कल्कीचे अवतार रुप असू शकते. विष्णूरुप मूर्तीमध्ये पाठशिळेवर अवतारांचे अंकन केलेले असते.

**शेषशायी विष्णूमूर्ती - असाधारण मूर्ती - विहिरीच्या कोनाडयात असलेली मूर्ती -जेऊर, ता.अक्कलकोट.**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ही शेषशायी असाधारण विष्णूमूर्ती काळयापाषाणातून घडविलेली आहे. ही विष्णूंची शयनमूर्ती आहे. ही विष्णूमूर्ती पाठशिळायुक्त आहे. मूर्तीची लांबी १२" असून रुंदी २६" आहे. ही मूर्ती पूर्णपणे चांगल्या स्थितीत आहे. भगवान विष्णू सप्तफण्याचा शेषावर पहूडलेले असून शेषफणा मूर्तीच्या डोक्याच्या भोवतीच वर्तुळाकार दिसतो. बाकी या मूर्तीत शेषाचे अस्तित्व दिसत नाहीत. मंदिराच्या गाभा-यातील मूर्तीत शेषफणा उभा आहे. तर या मूर्तीत तो डोक्याभोवती वर्तुळाकार आहे .हा फरक दिसतो.



प्रदक्षिणा क्रमाने हातांचा विचार केला तर साधारण उजवा हात श्री विष्णूंनी ह्दयावर ठेवलेला आहे. येथे बोटांची अग्रे जुळविलेली नाहीत. पाचही बोटे स्पष्ट दिसतात. दुस-या उजव्या हातांने डोक्याला आधार दिलेला आहे. निमूळता होत जाणारा किरीट मुकुट विष्णूंच्या डोक्यावर आहे. त्यामुळे हा हात मुकुटावरच स्थिरावला आहे. या हातातील गदा खाली डोक्याशी ठेवलेली आहे. तिस-या म्हणजे मागच्या डाव्या हातात चक्र आहे. आणि चौथा म्हणजे डावा हात मांडीवर टेकविला आहे. डावा पाय उजव्या पायावर ठेवून तळवा लक्ष्मीच्या मांडीवर टेकविला आहे. लक्ष्मी सुखासनात बसलेली आहे. डोक्याच्या मागे प्रभामंडळ दिसते .लक्ष्मी अलंकृत आहे. विष्णूंच्या डोक्यावर निमूळता होत जाणारा मुकुट आहे. बाकी अलंकरणे नेहमी सारखीच आहेत. विष्णूंच्या नाभीतून कमळ निघालेले आहे. कमळावर चारमुखी ब्रम्हदेव आसनस्थ आहेत . चौथे मुख अर्थात मागे गुप्त आहे. ही मूर्ती चतुर्भूज असून हातात आयुधे आहे.

पाठशिळायुक्त असलेली ही मूर्ती भव्य वाटते . या मूर्तीतत एक वेगळेपण जपलेले आहे. ते म्हणजे ब्रम्हदेवाच्या मूर्तीच्या दोन्ही बाजूस काही आकृती दिसतात . उजव्या बाजूस चार व डाव्या बाजूस तीन. डाव्याबाजूची कडेची एक मूर्ती अश्वारुढ आहे. जवळची एक मूर्ती म्हणजे बुध्द असावा तसेच उजव्या बाजूची पहिली आकृती नरसिंहाची वाटते . कारण ती चतुर्भूज आहे . हातात आयुधे दिसतात . चेह-यावर नरसिंहाचे उग्र रुप दिसते. म्हणजे पाठशिळेवर अवतारांचे अंकन केलेले असावे. या पेक्षा निश्चित बोध होऊ शकत नाही.

**विठ्ठल मूर्ती - असाधारण मूर्ती - जेऊर, ता. अक्कलकोट.**



काशिविश्वेश्वरा प्रमाणेच सोमलिंगेश्वर हे ही जेऊरचे एक दैवत आहे. या सोमलिंगेश्वराच्या मंदिरात एक प्राचीन विठ्ठल मूर्ती आहे. या मूर्तींचे वैशिष्टय म्हणजे या मूर्ती आसनावरच घडविलेल्या आहेत.म्हणजे एकसंध काळयापाषाणातच पीठ आहे व त्या पीठावर या मूर्ती त्याच पाषाणात कोरलेल्या आहेत. पिठाची रुंदी ३०" व उंची १५" आहे. याच पिठावर २६" उंचीची विठ्ठल रखुमाईची मूर्ती त्याच दगडात अखंड कोरलेली आहे. मूर्ती नेहमीसारखीच कटयवलंबित आहे. थोडे गुडघ्याखाली येणारे धोतर , कानात मकरकुंडले , डोक्यावर कंगोरेदार टोप, छातीवर श्रीवत्सचिन्ह अशी ही मूर्ती अतिशय सुंदर व वैशिष्टयपूर्ण वाटते.

**विष्णूमूर्ती - निजरुपमूर्ती - चपळगांव, ता. अक्कलकोट.**

अक्कलकोट पासून १० कि.मी. वर असलेले चपळगांव हे ठिकाण आहे. या गावात पुरातन मल्लिकार्जून मंदिर आहे. हे मंदिर हेमाडपंथी आहे व बहुकोनाकृती आहे. मंदिर बरेच प्राचीन आहे. या गावाचे हे ग्राम दैवत आहे. हे मंदिर कुठल्या काळातील आहे या विषयी निश्चितपणे सांगता येत नाही . परंतु पंधराव्या किवा सोळाव्या शतकातील असावे. खरे तर हे शिवमंदिर आहे. परंतु मल्लिकार्जून मंदिराच्या कक्षासनावर श्रीविष्णूची मूर्ती आहे. शिव व वैष्णवातले व्दैत या ठिकाणी दिसते . मंदिराबाहेरही पाठशिळेवर अतिप्राचीन व झिजलेल्या दोन विष्णूमूर्ती आहेत. प्रथम मंदिरातील कक्षासनावरील विष्णूमूर्ती पाहू .



मंदिरात कक्षासनावर ही मूर्ती अर्धउठावात कोरलेली आहे. मूळ मूर्ती काळया पाषाणातच घडविलेली आहे , पण रंगविल्यामुळे तिचा रंग वेगळा दिसतो आहे. ही विष्णू मूर्ती २६" उंच असून तिची रुंदी १२" आहे.मूर्ती पाठशिळायुक्त आहे. प्रदक्षिणा क्रमाने हाताच्या रचनेकडे पाहिले

तर उजवा हात अभय मुद्रेत आहे. मागील उजव्या हातात शंख व अक्षमाला आहे. तिस-या म्हणजे डाव्या हातात चक्र आहे व चौथ्या डाव्या हातात गदा आहे. ही गदा खाली पीठावर टेकविलेली आहे. श्री विष्णूंचा हात गदेवर अलगद स्थिरावलेला आहे. मागील दोन्ही आयुधांची पकड नाजूक आहे. ही मूर्ती आभंगावस्थेत उभी आहे. पायांचे तळवे खंडीत झालेले आहेत. तरी पायातील तोडे दिसतात . हातातही तोडे आहेत . पोटावर उदरबंध आहे .कंबरेला मेखला आहे, अनेक साखळया दिसतात . गळयात पायापर्यंत रुळणारी वनमाला आहे . गळयात यज्ञोपवीत, एकावली , हारयष्टीही आहे. हातात बोटामध्ये अंगठया आहेत. करंगळी व अंगठा यातही अंगठया दिसतात. कानात तांटक चक्र आहेत. डोक्यावर करंडक किरीट आहे. त्यावर कलाकुसरीची नक्षी आहे. किरीट निमुळता होत गेलेला आहे. शिवमंदिरात अशाप्रकारचे विष्णूचे वास्तव्य शैव व वैष्णव पंथातील दृढ भाव दाखविते.

**प्रवेशव्दारा बाहेरील विष्णूमूर्ती क्र. १**

मल्लिकार्जून मंदिराच्या प्रवेश व्दाराजवळ पाठशिळा युक्त दोन विष्णू मूर्ती आहेत. या दोन्ही मूर्ती अतिशय झिजलेल्या आहेत. त्या प्राचीन मूर्ती असाव्यात. उघडयावर असल्यामुळे अतिशय झीज झालेली आहे. मुळातच मूर्ती ओबडधोबड आहेत.



ही विष्णूमूर्ती ३०" उंच असून तिची रुंदी १५" आहे. मूर्ती चतुर्भूज आहे. व समपाद अवस्थेत उभी आहे. चेहरा घर्षण झाल्यामुळे दिसत नाही परंतु गुडघ्यापर्यंत लांब वैजयंतीमाला व हातातील आयुधांमुळे विष्णूमूर्तींची साक्ष पटते. प्रदक्षिणा क्रमाने उजवा हात अभय मुद्रेत आहे. उजव्या वरच्या हातात शंख आहे .

तिस-या म्हणजे डाव्या हातात चक्र आणि चौथ्या डाव्या हातात गदा आहे. अंगावरील एकही अलंकार दिसत नाही. निमुळता होत जाणारा किरीट तेवढा दिसतो आहे. पाठ शिळेवर उजव्या बाजूला श्रीलक्ष्मी आहे.



**विष्णूमूर्ती क्र.२**

वरच्या मूर्ती प्रमाणेच ही विष्णूमूर्ती पण पाठशिळा युक्त असून काळयापाषाणतच घडविलेली आहे. मूर्तीची ओळख लवकर पटत नाही. परंतु गुडघ्यापर्यंत लांब वैजंयतीमाला व निमुळता किरीट यामुळे ती विष्णूमूर्ती असावी असे वाटते. या मूर्तीचे वैशिष्ट म्हणजे ही मूर्ती व्दिभूज आहे. व्दिभूज विष्णूमूर्ती क्वचितच दिसते. समपाद अवस्थेत उभ्या असलेल्या या मूर्तीच्या अंगावर अलंकार दिसत नाहीत. हातात कोणती आयुधे आहेत तेही कळत नाहीत मात्र या मूर्तीचे हात उद्यतपाणी आहेत.

**लक्ष्मीविष्णू मूर्ती - निजरूप मूर्ती - देवीचा माळ , करमाळा.**

भक्ताच्या हाकेला देव धावून येतो म्हणतात. आणि आपल्या परमभक्तांस्थी तो नाना रुपे धारण करतो . उन्मनी अवस्थेत पोहोचलेल्या भक्ताच्या भेटीसाठी परब्रम्ह या भूमीवर अवतरले असले तरी एका समशेरबहाद्दराच्या भक्तीवर प्रसन्न होउन प्रत्यक्ष आदिमाया त्याच्या गावापर्यंत चालत आली. अशी घटना रावरंभा निंबाऴाकराच्या बाबतीत घडली. क्षात्रतेजस्विनी तुळजाभवानीचा हा परमभक्त देवीच्या वा-या करी

काळांतराने शरीर थकले. भक्तावर प्रसन्न होऊन प्रत्यक्ष देवीच त्याच्या गावापर्यंत आली. पण तिचा दृष्टांत असा " मी तुझ्या मागे चालत येईन पण तु मागे पाहायचे नाही. " परंतु गांव अगदी जवळ येताच राजाने मागे पाहिले व त्या माळावरच देवी थबकली.

तुळजापूरहून करमाळयास आलेली ही देवी कमलाभवानी म्हणून ओळखली जाते. देवीचे हे हेमाडपंथी मंदिर साधारण सतराव्या शतकातील असावे . आदिशक्तीचे हे पंचायतन आहे. आदिशक्ती , शिव, गजानन, सूर्यनारायण व गरुडारुढ लक्ष्मीपती श्रीविष्णू असे पंचायतन आहे.



प्रत्यक्ष विष्णू मूर्ती पाहताना ही लक्ष्मी विष्णूची गरुडारुढ मूर्ती आहे. लक्ष्मीनारायणाची ही मूर्ती काळयापाषाणात घडविलेली आहे. पाठशिळा कोरीव आहे. श्री विष्णू चतुर्भूज आहेत. श्री विष्णू गरुडावर आसनस्थ आहेत. ते सुखासनात बसलेले आहेत. श्री

विष्णूंच्या डाव्या मांडीवर लक्ष्मीदेवता सुखासनात बसलेली आहे. प्रतिमा अलंकृत आहे. प्रदक्षिणा क्रमाने उजवा हात मांडीवर ठेवलेला आहे. दुस-या उजव्या हातात चक्र आहे. डावा हात लक्ष्मीच्या मागे असून त्या हातामागे गदा धारण केलेली आहे आणि डाव्या चौथ्या हाताने श्री लक्ष्मीला धरलेले आहे. श्री लक्ष्मीच्या डाव्या पायाची मांडी आहे व उजवा पाय खाली सोडलेला आहे. तिचा डावा हात श्री विष्णूंच्या खांदयावर आहे  आणि उजवा हात समोर धरलेला आहे. श्री विष्णूंचा डावा पाय व लक्ष्मीचा उजवा पाय गरुडाच्या खांदयावर टेकल्याप्रमाणे वाटतात. विष्णूंचे वाहन गरुड हा देखील चतुर्भूज आहे. त्याचे दोन हात नमस्कार मुद्रेत आहेत. दुसऱ्या उजव्या हातामध्ये दंड दिसतो तर डाव्या हातामध्ये कलश दिसतो. एका हातात कलश आणि एका हातात दंड आहे याचा फारसा उलगडा होत नाही. बहुधा हा अमृत घट असावा. गरुड उत्कटासनात बसलेला आहे. त्याने आपल्या पाठीवर लक्ष्मी विष्णूंना घेतले आहे. गरुडाच्या दोन पायाच्या मध्यभागी नागदेवतेचा फणा आहे. या फण्याच्या उजव्या व डाव्या बाजूस आणखी दोन नागांचे फणे दिसतात. गरुडाने नागाचा फण्यांचा मुकुट घातलेला आहे. हातात बाहूवर बाजूबंदाच्या म्हणजे केयूराच्या ठिकाणी नागच आहेत .  खांदयांवर नागाचे फणे रुळताना दिसतात. हाता पायात तोडे असून गळयातही अलंकार आहेत. येथे गरुड व नागाचे सख्य दिसते. गरुडाच्या दोन्ही बाजूस दोन मानवी आकृती नमस्कार मुद्रेत दिसतात. भगवान विष्णूंच्या डोक्यावर निमूळता होत जाणारा करंडक मुकुट आहे. लक्ष्मीच्याही डोक्यावर अशाच प्रकारचा मुकुट आहे. हातात तोडे आहेत. कानात कुंडले आहेत. चेह-यावरील भाव सौम्य आहे. गळयात एकावली आहे. पाठशिळा कोरीव आहे.



**विष्णू मूर्ती - उत्सव मूर्ती - देवीचा माळ , करमाळा.**

देवीच्या मंदिरातील पंचायतनातील जी लक्ष्मी नारायणाची मूर्ती आहे तिचीच ही उत्सव मूर्ती आहे. ही मूर्ती पूर्णपणे पितळी आहे. या मूर्तीची उंची २०" असून रुंदी ८" असली तरी मुख्य मूर्ती १५" उंच आहे पायाखाली ५" चे कोरीव काम केलेले पीठ आहे. पायाखाली तीन गोलाकार कंगोरे आहेत. पैकी खालच्या

कंगो-यावर पाकळया आहेत. आणि हे वर्तूळाकार पीठ खालच्या चौकोनी पीठावर बसविलेले आहे. चौकोनी पीठासही तीन प्रकारच्या पट्टयांची नक्षी आहे. पीठावर उभी असलेली ही विष्णू मूर्ती समपाद आहे. मूर्तीच्या अंगावर असलेली वस्त्रे दाक्षिणात्य पध्दतीची आहेत. ती अतिशय सुबक दिसतात . अंगावरील अलंकार ही दाक्षिणात्य पध्दतीचे दिसतात . विष्णूमूर्ती चतुर्भूज आहे. पायात तोडे असून पैंजण सदृश्य चाळ आहेत. बोटात पादमुद्रीका आहेत. कमरेला पानाफुलांच्या नक्षीच्या साखळया आहेत. हातात कंकणे आहेत. दंडावर केयुर आहेत. खांदयांवर बाहुबंद आहेत . गळयात साखळया हारयष्टी पदक आहेत. डोक्यावर विशिष्ठ घडण असलेला निमूळता होत जाणारा मुकुट आहे. मुकुटांवर पानांची विलोभनीय नक्षी आहे. कानात कर्ण कुंडले आहेत.

प्रदक्षिणा क्रमाने उजवा हात अभय मुद्रेत आहे. हाताच्या बोटात अंगठयात अंगुलीयक आहेत. हातावर चिन्हांचे अंकन केले आहे. दुस-या उजव्या हातात शंख आहे. डाव्या हातात हरीण आहे. व खालचा डावा हात वरद मुद्रेत असून याही हातावर चिन्हांचे अंकन केलेले आहे. मूर्तीच्या चेह-यावर सौम्य भाव असले तरी मूर्तीची दृष्टी नासाग्री असलेली दिसते. एकंदर मूर्ती सुबक रेखीव व नाजूक वाटते.

**लक्ष्मी विष्णू मूर्ती - निजरुप मूर्ती - किल्ला विभाग , करमाळा.**

रंभाजी निंबाळकरांनी कमला देवीचे भव्य मंदिर बांधण्यास सुरवात केली. पुढे त्यांचे पुत्र जानोजीराव यांनी ते बांधकाम पूर्ण केले. या मंदिराबरोबरच म्हणजे सतराव्या शतकात करमाळयाचा पश्चिमेस जानोजीरावांनी एक भव्य भूईकोट किल्ला बांधलेला आहे. तो अठरा बुरुजांनी युक्त असा आहे. त्याला वेशीच्या स्वरुपाचा भव्य दरवाजा आहे. त्याच्या पुढे प्रशस्त मोकळी जागा आहे. त्याच्याही पुढे दोन बुरुजांनी युक्त असा महादरवाजा आहे. महादरवाजाच्या उजवीकडे बाहेरील बाजूस ब्रम्हा , विष्णू , महेश यांची मंदिरे आहेत. शिव मंदिरात चार मुखे असलेली गारेची शिवपिंडी आहे. हे मंदिर खोलेश्वर या नावाने ओळखतात. या खोलेश्वराच्या मंदिरा शेजारीच हे विष्णू मंदिर आहे. ही श्रीविष्णूंची मूर्ती देखील गारेची आहे. ही सफेद मूर्ती पाहताक्षणी मनाला आकर्षित करते . या मूर्तीची उंची ३८" असून रुंदी १८" आहे. श्री विष्णूंची ही चतुर्भूज मूर्ती आहे. गरुडाच्या खांदयावर विष्णू सुखासनात बसलेले आहेत. ही आसन मूर्ती

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहे. गरुड मानवी रुपात आहे. तो व्दिभूज आहे. आणि आपल्या दोन्ही भुजांनी त्याने विष्णूंना तोलून धरले आहे. गरुड उत्कटासनात बसलेला आहे. उजव्या पायाचा गुडघा उभा आहे. त्यावर विष्णूंचा उजवा पाय स्थिरावला आहे. डावा पाय गुडघ्यावर टेकविलेला आहे. पण या मांडीवर एक नागफणा आहे. त्यावर श्री विष्णूंचा डावा पाय स्थिरावला आहे. गरुडाच्या दोन्ही पायाचा मध्ये नागाचा फणा आहे. डावा गुडघा टेकविलेला आहे. त्या गुडघ्याच्या खाली देखील एक छोटा नागफणा आहे. एवढेच काय गरुड मित्र नागाचेच सर्व अलंकार या गरुडाच्या अंगावर आहेत. पायात नागाचेच तोडे आहेत. गळयातील एकावली म्हणजे नागच आहे. कानातील कुंडले म्हणजे छोटे नागच



आहेत. डोक्यावर नागफण्याचा मुकुट आहे. हात मागे असल्यामुळे त्यातील अलंकार दिसत नाहीत. प्रदक्षिणा क्रमाने श्री विष्णूंचा उजवा हात वरद मुद्रेत आहे. हातावर चिन्हांकन केले आहे. दुस-या उजव्या हातात गदा आहे. गदेवरील पकड दृढ आहे. तिस-या म्हणजे डाव्या हातात चक्र आहे. हा हात लक्ष्मीच्या मागे गेलेला आहे. फक्त चक्र दिसते व चौथ्या हातात शंख धरलेला असून या डाव्या हातावरच लक्ष्मीला धरलेले आहे. लक्ष्मीची मूर्ती आकाराने छोटी आहे. ती मांडीवर न दाखविता फक्त हातावरच दाखविली आहे. हातावर बसलेली असली तरी मूर्ती लहान असल्यामुळे ती उभी असल्यासारखीच वाटते . लक्ष्मीचा उजवा हात श्री विष्णूंच्या खांदयावर आहे व डाव्या हातात सनालकमळ आहे. पाय अधांतरीच दिसतात. डोक्यावर किरीट आहे. भगवान विष्णूंच्या हातात, पायात तोडे, गळयात एकावली, हारयष्टी, छातीवर श्री वत्सचिन्ह आहे. डोक्यावर निमूळता होत जाणारा मुकुट आहे. चेह-यावर सौम्य हास्य आहे. मूर्ती पाठशिळा युक्त म्हणता येणार नाही कारण ती पूर्ण घडविलेली आहे. फक्त मागच्या बाजूला कमानी प्रमाणे शिळा दिसते. मूर्ती पूर्ण उठावातील आहे.

**व्यंकटेश मूर्ती - असाधारण मूर्ती - देवीचा माळ , करमाळा.**

कमलादेवीच्या मुख्य मंदिराखेरीज त्या काळात इतरत्र आसपास अनेक छोटी मंदिरेही बांधलेली आहेत. त्यामधील एक म्हणजे व्यंकटेश उर्फ बालाजी अर्थात श्रीनिवास. ही मूर्ती काळया पाषाणात घडविलेली आहे. मूर्ती तितकीशी सुबक नाही पण ओबड धोबड ही नाही. पाठशिळा युक्तही म्हणता येणार नाही कारण मूर्तीच्या बाजूने फक्त दगडी कमान दिसते. ही व्यंकटेश मूर्ती ३४ " उंच असून १६" रुंद आहे. ही स्थानक प्रकारातील असून समपाद अवस्थेत उभी आहे. डावा हात कमरेवर ठेवून मागील हातात चक्र, शंख घेतलेल्या विष्णूला श्रीनिवास , व्यंकटेश किंवा बालाजी म्हणून ओळखले जाते. तो कटयवलंबित हात जणू सूचवितो की भक्ताकरिता भव समुद्र क मरे इतकाच खोल आहे.



या श्रीनिवास मूर्तीचाही प्रदक्षिणा क्रमाने उजवा हात वरद मुद्रेत आहे. मागच्या हातामध्ये चक्र आहे. दुस-या मागच्या म्हणजे डाव्याहातात शंख आहे. व डावा पाय कमरेजवळ टेकविल्यासारखा आहे. त्याला खाली काही आधार आहे. वरद मुद्रा असलेल्या हातातही कणीस सदृष्य काही वस्तू दिसते. मूर्तीच्या अंगावरील वस्त्र दाक्षिणात्य पध्दतीचे रेखीव वाटते. धोतराचा सोगा वेगळया पध्दतीचा वाटतो. खाली पाया पर्यंत धोतर आहे. त्याखाली पायात तोडे दिसतात कमरेला कटिबंध आहे. हातात तोडे गळयात यज्ञोपवीत एकावली हारयष्टी आहे. दंडावर नाजूक केयूर आहे. कानात कुंडले दिसत नाहीत. डोक्यावर निमूळता होत जाणारा मुकुट आहे. तो अतिशय साधा आहे. त्यावर कोणतेही नक्षीकाम केलेले नाही. मात्र चेहरा स्मित मुख आहे.



**व्यंकटेश मूर्ती - असाधारण मूर्ती - देवीचामाळ ,करमाळा.**

व्यंकटेशाच्या या मंदिरातच आणखी एक व्यंकटेशाची मूर्ती आहे. या मूर्तीची स्थापना केलेली नाही. ती तशीच खाली उभी केलेली आहे. ती नंतरची आहे का त्याच काळातील आहे ते कळत नाही. मूर्ती अतिशय ओबडधोबड घडविलेली आहे. मात्र ती व्यंकटेशाचीच आहे यात वाद

नाही. मूर्तीचा पाषाण पूर्णतः काळा पाषाण दिसत नाही. मूर्ती चित्र प्रकारात मोडणारी आहे.मूर्तीच्या मागेही अंकन केलेले दिसते. ही मूर्ती २८" उंच असून १४" रुंद आहे. या मूर्तीला खाली ४" उंचीचे दगडी पीठ आहे. या पीठावर समपाद अवस्थेत ही मूर्ती उभी आहे. पायात तोडे आहेत. वस्त्र ही ओबडधोबडच कोरलेले आहे. कंमरेला कमरबंध , गळयात हारयष्टी मोठे पदक आहे. प्रदक्षिणा क्रमाने उजवा हात वरद मुद्रेत आहे. मागच्या हातात चक्र आहे. दुस-या मागच्या म्हणजे डाव्या हातात शंख आहे आणि चौथा म्हणजे डावा हात कमरेजवळ आधाराने टेकविलेला आहे. डोक्यावर निमुळता होत जाणारा मुकूट आहे. कानात कुंडले आहेत अशी ही स्थानक मूर्ती आहे.

**विष्णू मूर्ती- निजरुप मूर्ती - अंजनडोह , ता. करमाळा.**



करमाळयापासून १२ कि.मी. वर असलेले हे ठिकाण. रावरंभा निंबाळकरांच्या काळात लष्कराचे ठिकाण होते. लष्कराची छावणी येथे होती. दारु गोळयाचा साठा येथून पुरविला जात होता. हे सारा वसूलीचे ठिकाण होते त्यामूळे रंभाजी निंबाळकरांच्या काळात या ठिकाणाला विशेष महत्व होते. या अंजनडोह गावात पाटलाची गढी म्हणून ओळखले जाणारे ठिकाण आहे. या खेरीज धर्मा देवीचे गढी म्हणून ओळखली जाणारी गढी आहे. या ठिकाणी प्रत्यक्ष धर्मराजाने या देवीची स्थापना केली अशी अख्यायिका सांगतात. त्यामुळेच त्या देवीचे नाव धर्मादेवी पडले आहे. म्हणजे या देवीचे नाते पांडवांशी सांगतात. ही इतकी प्राचीन देवी आहे. त्याच देवीचे दुसरे मंदिर गढीच्या पायथ्याशी आहे आणि तेथेच हे विष्णूचे छोटेखानी मंदिर आहे.

श्री विष्णूंची पुरुंदाच्या दगडात घडविलेली मूर्ती आहे. त्यामूळे ती लालसर दिसते. मूर्ती अर्थात ओबडधोबडच आहे. खूप प्राचीन असावी. विष्णूमूर्तीची उंची २०" असून रुंदी ११" आहे. विष्णूमूर्ती स्थानक प्रकारातील असून समपाद अवस्थेत उभी आहे. प्रदक्षिणा क्रमाने हाताकडे पाहिले तर उजव्या हाताचा पंजा खंडीत झालेला आहे. पण तो वरद मुद्रेत असावा दुस-या हातात शंख आहे. तिस-या म्हणजे मागच्या डाव्या हातात चक्र आहे. आणि चौथ्या

म्हणजे डाव्या हातात गदा आहे. शंख, चक्र, गदाधर अशी ही विष्णू मूर्ती प्राचीन असावी ,कारण कमळ ही दिसत नाही. कमळाचा उगम होण्या पूर्वीची असावी. मूर्ती पाठशिळायुक्त आहे. विष्णू मूर्तीच्या डोक्याभवती प्रभामंडळ आहे. मूर्ती जरी ओबडधोबड असली तरी मूर्तीच्या अंगावरील अलंकरणे दिसतात. पायात तोडे आहेत. हातातील तोडेही दिसतात. कमरेच्या मेखल्याच्या साखळया जाड आहेत. वस्त्राचा सोगा लोंबताना दिसतो . गळयात वैजयंती माळा आहे. हारयष्टी ही आहे. कानात कुंडले व डोक्यावर निमुळता होत जाणारा किरीट आहे. कुठल्याही अलंकारात सुबकता व कोरीवपणा नाही. फक्त दागिने जागच्या जागी आहेत एवढे जाणवते चेहरा स्पष्ट दिसत नाही, त्यामुळे मुखावरील भाव कळत नाहीत. पायाशी लक्ष्मी व सरस्वती आहेत. त्यापैकी उजवीकडील बसलेली तर डावीकडील उभी आहे.

**विष्णू मूर्ती - निजरुप मूर्ती - वरकुटे, ता. करमाळा.**

करमाळयापासून २२ कि.मी. अंतरावर असलेले वरकुटे हे ठिकाण हे गांव आज मूर्तीचे वरकुटे म्हणून ओळखले जाते. या गावातील पाषाण शिल्पे अतिशय अप्रतिम आहेत. त्यामुळेच की काय या गावाचा उल्लेख मूर्तीचे वरकुटे असा केला जातो. या वरकुटयाच्या माळावर एक पाझर तलावाचे काम चालू असताना बत्तीस शिलाखंड सापडले. तेव्हापासून हे गाव मूर्तीचे वरकुटे म्हणून ओळखले जाऊ लागले.

महाराष्ट्राच्या इतिहासात करमाळयाचे उल्लेख बहामनी राजवटीच्या काळापासून मिळतात. यादव काळापासून मिळतात. यादव काळातही हा प्रदेश अस्तिवात होता. हे दाखविणारे अनेक पुरावे स्थापनाच्या रुपाने जागोजाग सापडतात. परन्तु वरकुटे येथे सापडलेल्या मूर्ती थेट मध्ययुगीन भारताच्या इतिहासाशी नाते
सांगणा-या आहेत. द्रविडी शैलीशी नाते सांगणारी वरकुटयाच्या माळावर सापडलेली बत्तीस शिल्पे म्हणजे मंदिराच्या बाहेरच्या भागाचे भग्नावशेष असावेत. एखादे बहुकोनाकृती मंदिर या भागात केव्हातरी असावे कालौघात ते नष्ट झाले असावे. बाराव्या तेराव्या शतकात महाराष्ट्राचे राजकीय केंद्र स्थान एका जागी स्थिर नव्हते. वेगवेगळया राजघराण्याच्या अमलामुळे ते सतत बदलत असे. या राजकर्त्यांच्या सीमा सतत बदलत असत. याच काळात वरकुटे येथे ही शिल्पे निर्माण केली गेली असावीत म्हणूनच शिलाखंडात कोरलेल्या या मूर्ती हळेबीड बेलूरशी

विलक्षण साम्य दाखवितात. या मूर्तीत चार मूर्ती श्री विष्णूंच्या आहेत. या पैकी एक अर्धी भंगलेलीच आहे. त्यामुळे तीन मूर्तीचाच येथे विचार केलेला आहे.



ही विष्णू मूर्ती स्थानक प्रकारातील आहे. पाठशिलायुक्त असून त्रिभंगावस्थेतील आहे. अतिशय कोरीव आहे. या प्रतिमेची उंची २४" असून रूंदी १२" आहे. मूर्ती चतुर्भूज आहे. प्रदक्षिणा क्रमाने उजव्या हातात गदा आहे. ही गदा जमिनीवर टेकविलेली आहे. अंगावरील अलंकारासारखी गदा देखील अलंकृत वाटते. विष्णूंचा हात गदेवर विसावला आहे. दुस-या उजव्या हातात परशू आहे. अंगठा व तर्जनीत परशुला धरले आहे.

तिस-या हातात नाग दिसतो त्यामुळे विष्णुमूर्ती वैशिष्टयपूर्ण वाटते. डोक्याच्या मागूनही नाग आहे आणि त्याचे तोंड त्यांनी हातात धरलेले आहे. चौथ्या म्हणजे डाव्या हातात फलसदृश्य वस्तु आहे. ती त्यांनी हातात धरलेली आहे ती नक्की फळ आहे की काय याचा बोध होत नाही. विष्णूमूर्तींच्या हातात फळ क्वचीतच दिसते पायाची अवस्था त्रिभंगावस्था आहे. पायाशी डाव्या बाजूला गजमुख आहे. पायाशी गजमुख हाही मुर्तीचा वेगळेपणा आहे. विष्णूमूर्ती पुर्णपणे अलंकृत वाटते. पायात तोडे आहेत, हातातही तोडे आहेत, त्याबरोबर दंडावर केयूर आहेत. कमरेला मेखला उदरबंध आहे. साखळयांचे कमरबंध, गळयांत पायापर्यंत येणारी वैजयंतीमाला, एकावली ,यज्ञोपवीत, गळसरी इत्यादी अलंकार आहेत. कानात तांटकचक्र डोक्यावरील मुकुट वैविध्यपूर्ण आहे. तो पूर्णपणे निमुळताही होत गेलेला नाही. अतिशय कोरीव आहे. विष्णूमूर्तीचा चेहरा स्मितहास्य करतो आहे.

ही विष्णुमूर्ती काळया पाषाणात घडविलेली आहे. अंगावरील सुबक कोरीव अलंकार हळेबीड बेलूरशी साधर्म्य दाखवितात.

**विष्णूमूर्ती क्र. २ निजरुप मूर्ती-वरकुटे**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वरकुटे येथील बत्तीस शिल्प खंडातीलच ही विष्णमूर्ती आहे. मूर्ती काळया पाषाणात सुबकतेने घडविलेली आहे. परन्तु भाविकांनी केलेल्या तेल व कुंकवाच्या अतिरिक्त वापराने पाषाण पांढरट वाटतो. मुर्तीची उंची २२" असून रुंदी १३" आहे. ही विष्णूमुर्ती स्थानक प्रकारातील आहे. साधारण ही विष्णूमूर्ती क्र १ प्रमाणेच आहेत. कारण आयुधांची पकड, दागिन्यात व वस्त्रात किंचित बदल सोडला तर प्रतिमा साधारण सारख्या वाटतात. पण ही विष्णूमूर्ती आभंगावस्थेत आहे व चेहरा सौम्य हास्य करताना दिसतो. ही विष्णूमूर्ती चतुर्भूज आहे. प्रदक्षिणा क्रमाने उजवा हात गदेवर अलगद टेकलेला आहे.गदा जमिनीवर पायाशी समांतर विसावलेली आहे. दुस-या



उजव्या हातात अत्यंत नाजुकपणे परशू पकडलेला आहे. हे बाकीच्या बोटांच्या नाजुक वळणातून दिसते. डाव्या हातात नाग असून नागाची पकड ही अतिशय हळूवार आहे. हा नागाचा विळखा मागून येताना अतिशय मोठा आहे. परन्तु हाताशी आल्यावर त्याचे तोंड निमुळते होत गेलेले आहे. चौथ्या म्हणजे डाव्या हातात फळसादृष्य वस्तू धरलेली आहे. सिताफळासारखे ब-याच ि बियांनी भरलेले फळ आहे. (विविध प्रकारच्या उत्प-तीचे द्योतक) पाय समपाद दिसत असले तरी ते तसे नाहीत. डावा पाय अभंगावस्थेत आहे. या विष्णूमूर्तीची अलंकरणे अधिक कोरीव व मोठाली आहेत. त्यामुळे ती भव्य वाटतात. सर्व अलंकारातील साखळया दुपेडी आहेत. गळयात पायापर्यंत रुळणारी वैजयंतीमाला आहे. रत्नखचित य आहे. गळयात गळसरी एकावली हार दिसतात. पोटावर उदरबंध आहे. कमरेला कोरीव साखळयांची मेखला आहे. गळयात फलक हार ही रुळतो आहे. पायात रुंद तोडे आहेत. या विष्णूमूर्तीच्या पायात पैंजण तसेच नूपुर आहेत. हे या विष्णूमूर्तीचे वेगळेपण आहे. हातातील तोडेही रुंद आहेत. त्यावर तिपेडी नक्षीकाम आहे. दंडावर केयूर आहेत. कानात तांटकचक्र, डोक्यावर निमुळता होत जाणारा किरीट मुकुट आहे. किरीटावरही कोरीव नक्षीकाम केलेले आहे. डाव्या पायाशी एक ह-ती बसलेला आहे. त्याचे तोंड उजवीकडे वळलेले आहे. आणि खाली पहात तो

शांतपणें बसलेला दिसतो. मूर्ती पाहताना हळळेबीड बेल्लूरची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

## विष्णूमूर्ती क्र.३ -निजरुप मूर्ती - वरकुटे

एका अनोख्या शैलीशी नाते सांगणा-या या वरकुटयाच्या मूर्तीमधील एक विष्णूमूर्ती अतिशय आगळीवेगळी व वैविध्यपूर्ण वाटते. ही विष्णूमूर्ती आसनमूर्ती आहे. आणि या मूर्तीत श्री विष्णू पाच फण्याच्या नागांवर आरुढ झाले आहेत. मूर्तीची उंची २२" असून रुंदी १३" आहे.आणि ही मूर्ती काळया पाषाणात घडविलेली आहे. मूर्ती घडविताना कलाकाराने आपले कसब पणाला लावले आहे. इतक्या नाजूक व कोरीव अलंकरणाने ही मूर्ती अलंकृत झालेली आहे. नागावर बसलेल्या या मूर्तीकडे पाहिल्यावर कालियामर्दनची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. कारण नागावर बसलेल्या विष्णूमूर्तीची बसण्याची



पध्दत थेट कालियामर्दन कृष्णासारखी आहे. ते सुखासनात बसलेले असून उजव्या पायाची अर्धवट मांडी व डावा पाय खाली सोडलेला जमिनीवर टेकविलेला आहे. प्रदक्षिणा क्रमाने उजव्या हातात शंख धरलेला आहे. तो मांडीवर टेकविल्याप्रमाणे वाटतो. मागील उजवा हात उद्‌बाहू असून हातात छोटा नाग आहे. हा नाग हातात आडवा असल्यामूळे नागाचे तोंड श्री विष्णूंच्या कानाच्या वरती मुकुटाला टेकले आहे. डाव्या हातात चक्र धारण केलेले आहे. पाठशिळायुक्त अशी ही मूर्ती असून अर्धउठावात आहे. उठावातील पोकळीचे भाग अधिक जाणवतात. त्यामुळे हातातील चक्र पुढे आलेले व उठावदार दिसते. चौथा हात खंडित झालेला आहे. त्यामुळे या हातात कोणते आयुध असावे याविषयी तर्क करता येत नाही.

खाली दोन्ही पायांच्या दोन्ही बाजूस छोटया मानवी आकाराच्या मूर्ती आहेत. उजव्या बाजूस तीन व डाव्या बाजूस तीन म्हणजे एकूण सहा आकृती आहेत. त्या मूर्तीच्या डोक्यावर नागफणा आहे. बहुधा त्या नागकन्या असाव्यात. श्री विष्णू ज्या पाच फण्यांच्या नागावर बसलेले आहेत

त्या नागाचा विळखा त्यांच्या पायाखाली दिसतो. त्या नागाच्या बाजूसच हया नागकन्या उभ्या आहेत. दोन्ही बाजूस पहिली नागकन्या बसली असून तिचे हात नमस्कार मुद्रेत आहेत. डोक्यावर नागफणा आहे. दुसरी नागकन्या उभी असून तिने आपले हात विष्णूमर्तीच्या पायाला लावलेले आहेत. तिच्याही डोक्यावर नागफणा आहे. तिचे हात खालीच आहेत. या छोटया मूर्तीही अलंकृत आहेत. श्री विष्णूंच्या हातात तोडे आहेत. दंडात केयूर, बाहूभूषणे आहेत. पायात तोडे, पैंजण, नूपुर दिसतात. आसनावस्थेत असल्यामुळे डाव्या मांडीवर अंलकाराच्या साखळया दिसतात. त्या साखळया मेखला, कमरबंधाच्या असाव्यात. गळयात गळसरी,एकावली पदके दिसतात. कानात कर्णभूषणे ताटंकचक्रे दिसतात. डोक्यावर सुबक निमुळता होत गेलेला किरीट मुकट आहे. त्यावर बारीक नक्षीकाम आहे.

**लक्ष्मी नारायण मूर्ती - निजरुप मूर्ती, हिवरे,ता. करमाळा**

करमाळा शहरापासून थोडया आडबाजूला असणा-या सुमारे दहा किलोमीटर अंतरावर असलेले नागोबाचे हिवरे म्हणून ओळखले जाणारे हिवरे गाव आहे. या गावात बरीच प्राचीन बांधकामे किंवा त्यांचे अवशेष आढळतात. तेथे एक प्राचीन भूमीज शैलीतील शिवमंदीर आहे. या मंदीराच्या आावारात लक्ष्मीनारायणाची मूर्ती आढळते. ही लक्ष्मीनारायणाची गरुडारुढ आसनमूर्ती आणि श्रीविष्णूची प्राचीन स्थानक मूर्ती अशा दोन मूर्ती मंदिराच्या बाहेर आवारात आहेत.

लक्ष्मीनारायणाची ही मूर्ती अतिशय जुनी व प्राचीन आहे. ती वालुकाश्म पाषाणात घडविलेली आहे. मूर्तीची उंची ३४" असून रुंदी २४" आहे. ही आसनमूर्ती आहे. मूर्ती आवारात उघडयावर असल्यामूळे उन्हा-पावसाच्या मा-याने हा पाषाण बराचसा झिजला आहे. त्यामुळे ती अधिकच प्राचीन वाटते. ही मूर्ती पाठशिळायुक्त आहे. मूर्ती मुळात सुबक आहे. परंतु वरच्या भागाची झीज झाल्यामुळे पाषाण ओबडधोबड बनला आहे. ही मूर्ती आसनप्रकारातील



असून चतुर्भूज आहे. लक्ष्मीनारायण गरुडावर आरुढ झालेले आहेत. ते सुखासनात बसलेले

आहेत. खाली मानवी रुपात गरुड बसलेला आहे. तो उत्कटासनात बसलेला आहे. त्याच्या दोन पायांच्या मध्ये वस्त्राचा सोगा दिसतो आहे. गरुड द्विभूज आहे. त्याच्या पायात तोडे दिसतात, बाकी अलंकार अंगावर स्पष्ट दिसत नाही, कारण पाषाणाची झीज झालेली आहे. गरुडाचे हात नमस्कार मुद्रेत आहेत. लक्ष्मीनारायणाच्या मानाने हा आकाराने लहान दिसतो. त्याच्या डोक्यावर विशिष्ट प्रकारचा निमुळता होत गेलेला मुकुट आहे.

श्री विष्णूच्या प्रदक्षिणा क्रमाने हाताचा विचार केला तर उजवा हात खंडित झालेला आहे. त्यामुळे तो वरद मुद्रेत आहे का अभय मुद्रेत ते सांगता येत नाही. तसेच मागचा उजवा हातही खंडीत झालेला आहे. त्यामुळे मागच्या हातात कोणते आयुध असावे हे सांगणे कठीण आहे. दंडातील बाजूबंद तेवढे दिसतात. तिस-या डाव्या हातात गदा आहे. हा हात लक्ष्मीच्या मागील बाजूने खाली आलेला आहे. गदा पीठावर टेकविलेली आहे . गदा नक्षीकाम केलेली आहे. चौथ्या म्हणजे डाव्या हाताने लक्ष्मीला कमरेजवळ धरलेले आहे . लक्ष्मी द्विभूज आहे . श्री लक्ष्मीचा उजवा हात श्री विष्णूंच्या खांदयावर आहे. डावा हात मांडीवर आहे. तो खंडित झालेला आहे. गुप्त काळातील प्रतिमा प्रमाणे लक्ष्मीचे वक्षस्थळ पुष्ट व उन्नत दाखविले आहे. श्री विष्णूच्या व लक्ष्मीच्या चेह-याभोवती प्रभामंडळ दिसते. ही वैशिष्टये गुप्तकाळाप्रमाणे वाटतात. लक्ष्मीच्या गळयात जाडसर हारयष्टी आहे. कानात कुंडले आहेत. कमरेला कमरबंध आहे. डोक्यावर किरीट आहे. श्री विष्णूंच्या डोक्यावरही वैशिष्टयपूर्ण किरीट आहे. त्यावर बारीक नक्षीकाम आहे. वर निमूळता होत गेलेला आहे. कानात तांटकचक्र व गळयात हारयष्टी आहे. पोटावरील उदरबंध, तसेच विष्णूंच्या पायापर्यंत लोंबणारी अक्षमाला आहे. त्यांनी डाव्या पायाची मांडी घालून उजवा पाय खाली सोडला आहे. तो गरुडाच्या खांदयावर स्थिरावला आहे. डाव्या मांडीवर लक्ष्मी बस लेली आहे. तिने उजव्या पायाची मांडी घातलेली आहे व डावा पाय खाली सोडला आहे तो गरुडाच्या खांदयावर टेकविला आहे. विष्णूंच्या पायातील तोडयाबरोबर पैंजणही दिसतात. उजव्या कोप-यावर एक मानवी आकृती दिसते. बहुधा पाठशिळेवरील कोरीव कामातील असावी. एकूण मूर्ती प्राचीन काळातील वाटते.

## विष्णूमूर्ती - निजरुप मूर्ती - हिवरे, ता. करमाळा.

लक्ष्मीनारायणाच्या मूर्तीइतकीच प्राचीन अशी ही मूर्ती वाटते. या दोन्ही मूर्ती समकालीन आहेत असे वाटते. कारण या विष्णूमूर्तीचा पाषाणही वालुकाश्मच आहे आणि मूर्तीची झीजही तशीच झालेली आहे. त्यामुळे मूळच्या रेखीव मूर्तीस ओबडधोबडपणा प्राप्त झालेला आहे. ही विष्णूमूर्ती पाठशिळायुक्त असून या मूर्तीची उंची २५" आहे व रुंदी १६" आहे. ही विष्णूमूर्ती समपाद अवस्थेत उभी आहे. मूर्ती तशी प्राचीनच वाटते. प्रदक्षिणाक्रमाने हात पाहिले तर उजवा हात खंडित झालेला आहे. तो अभयमुद्रेत असावा. दुस-या उजव्या हातात शंख आहे. तिसरा म्हणजे डावा हात खंडित झालेला आहे आणि चौथ्या डाव्या हातात गदा आहे. ही गदा पीठावर टेकविलेली आहे. हात गदेवर आहे.गदा नक्षीकामयुक्त आहे. दोन्ही मूर्तीतील गदेत साम्य वाटते . तसेच अंगावरील अंलकारात साम्य वाटते. पायातील तोडे ,अक्षमाला, गळयातील अंलकार, कानातील कुंडले, दंडावरील केयूर यात एकसारखेपणा आहे. तसेच लक्ष्मीनारायण मूर्तीतील गरुडाचा मुकुट व या मूर्तीतील श्रींचा मुकुट यात विलक्षण साम्य आहे. त्यामुळे दोन्ही मूर्ती समकालीन असाव्यात. या मूर्तीच्या उजव्या व डाव्या बाजूस श्रीलक्ष्मी व सरस्वती आहेत. मूर्तीचा चेहरा झिजला असला तरी सुबक वाटतो.



## विठ्ठल मूर्ती - असाधारण मूर्ती -जुने विठ्ठल मंदिर, सोलापूर.

सोलापूर हे गाव पूर्वीपासून गिरण्यांचे गाव म्हणून ओळखले जाते. या जिल्हयात मोत्यासारखा शाळू पिकतो. तसेच कापड गिरण्या, साखर कारखाने चालतात. स्वातंत्र्य युध्दात प्राणांची आहूती देणा-या हुतात्म्यांची भूमी म्हणूनही ते ओळखले जाते. हया जिल्हयाला संतांची भूमीही म्हणावे लागेल. आणि या जिल्हयाला प्राचीन इतिहास आहे. त्यामुळेच देवता विविध अवतारात व रुपात आपल्यास भेटतात.

सोलापूरमध्ये जोशी गल्लीमध्ये जुने विठ्ठलमंदीर आहे. या मंदिरात ९०० वर्षाची परंपरा आहे. असे म्हणतात की ,राजस्थानमध्ये परकियांचे आक्रमण झाल्यावर तेथील राजा दक्षिणेकडे निघाला होता. वाटेत नदीत स्नान करीत असताना त्याला विठ्ठलाची मूर्ती सापडली. हया मूर्तीचे ओझे कसे घेऊन जावे हा यक्षप्रश्न त्याच्यापुढे पडला, म्हणून या मूर्तीची येथे स्थापना करण्यात आली अशी आख्यायिका सांगितली जाते. शाहीर रामजोशींच्या घराण्याकडे पिढीजात पूजा आहे. रामजोशींच्या आगोदरच्या काळापासून ही मूर्ती अस्तित्वात आहे . ही स्थानक मूर्ती आहे. मूर्तीची उंची २८" असून रुंदी १२" आहे. ही विठ्ठलमूर्ती अतिशय प्राचीन वाटते. कट्यवलंबित समपाद अवस्थेत उभी असलेली ही विठ्ठलाची योगमूर्ती आहे. या वालुकाश्म पाषाणाच्या मूर्तीच्या चेह-यावर लेपन केलेले असल्यामूळे फक्त चेहराच चांगला आहे, परंतु मूर्तीचा बाकीचा पूर्ण शरीराचा भाग हात लावला तर वाळूचे खडे हाताला लागतात. सच्छिद्र पाषाण आहे व अत्यंत झिजलेला आहे. त्यामूळे मूर्तीच्या शरीरावर दागिन्यांचे कुठलेच अंकन दिसत नाही. या मूर्तीला ब्रिटीश काळात ब्रिटीश केंद्रीय शासनाकडून दरवर्षी आहेर देण्याची पध्दत होती. ती सध्याच्या सरकारकडून अजूनही चालूच आहे.



### विदरण नरसिंह - अवतार मूर्ती - सोलापूर

जुन्या विठ्ठल मंदिरातच आवारात झाडाखाली ही नरसिंहाचे उग्र रुप आहे. नरसिंहाची ही मूर्ती चतूर्भूज आहे. नरसिंह पद्मासनात बसलेले आहेत. मांडीवर हिरण्यकश्यपूची छोटीशी मूर्ती आहे. समोरच्या दोन्ही हाताने ते पोट फाडीत आहेत. त्यामूळे या मूर्तीस विदरण नरसिंह असे म्हणतात. मागच्या दोन हातात चक्र व शंख आहे. ही नरसिंहाची मूर्ती पाठशिळायुक्त आहे. मागची पाठशिळा थोडी चौकोनी आहे. ही मूर्ती थोडी प्राचीन वाटते. शरीरावर दागिन्यांचे अंकन केलेले अजिबात दिसत नाही, ते मूर्ती झिजल्यामूळे झाले आहे असे



नाही तर मुळात मूर्तीवरच ते केलेले नाही. पाषाण तसा काळाच आहे. पण थोडा पांढरट पडलेला आहे.

**विठ्ठलमूर्ती - असाधारण मूर्ती- चौपाड , सोलापूर.**



सुमारे १५० ते २०० वर्षाची परंपरा असलेले हे चौपाडातील विठ्ठल मंदिर आहे. विठ्ठल मंदिर उभारण्यापूर्वी तिथे एक डबके होते असे सांगतात. त्यामुळे तिथे असलेले मारुतीचे मंदिर "डबक्या मारुती "म्हणून प्रसिध्द आहे. विठ्ठल मंदिर बांधताना ती मूर्ती काढण्याचा प्रयत्न केला पण ती पूर्ण निघाली नाही मग ती तिथे तशीच ठेवून बाजूला हे मंदिर उभारले.

या मंदिरात कटयावलंबित विठ्ठल रुक्मीणीच्या मूर्ती आहेत. या मूर्ती अलीकडील काळातील आहेत. त्या फारश्या जुन्या नाहीत. त्यामुळे ही विठ्ठल मूर्ती रेखीव आहे.

**श्री विष्णू लक्ष्मी मूर्ती - निजरुप मूर्ती - लक्ष्मी मार्केट, सोलापूर.**

ही श्री विष्णूची मूर्ती स्थानक मूर्ती आहे सोबत लक्ष्मी आहे. मंदिर पूर्णपणे खाजगी मालकीचे आहे. ही विष्णूमूर्ती तीनशे वर्षापूर्वीची आहे असे सांगतात. श्री चिंचोळीकर यांच्या मालकीचे मंदिर आहे .अशी अख्यायिका आहे की, एक भक्ताच्या स्वप्नात सुमारे ९० वर्षापूर्वी श्री विष्णू आले व त्यांनी सांगितले की मी येथे एकटाच उभा आहे, तरी श्री लक्ष्मीची स्थापना करा. त्यानंतर श्री लक्ष्मीची मूर्ती उभारली गेली.



श्री विष्णूलक्ष्मीच्या हया मूर्ती संगमरवरी आहेत. मूर्ती अतिशय सुंदर व रेखीव आहेत. श्री विष्णूची मूर्ती १४" रुंद असून ३२" उंच अर्धवर्तुळाकार लांबट कमानीला टेकविल्यासारखी आहे. लक्ष्मी नंतरची असल्यामुळे तिच्या भोवती कमान नाही. श्री विष्णूची ही समपाद अवस्थेतील चतुर्भूज योगमूर्ती आहे. प्रदक्षिणाक्रमाने उजव्या हातात गदा, मागच्या हातात पद्म, डाव्या मागच्या हातात शंख व डाव्या

चौथ्या हातात चक्र आहे. पायातील तोडे, हातातील तोडे व डोक्यावरील किरीट एवढे अलंकार सांगता येतात. लक्ष्मीची मूर्ती द्विभूज असून समपाद अवस्थेत उभी आहे. उजवा हात अभय मुद्रेत आहे आणि डावा हात खाली सोडलेला आहे. श्री विष्णूंची मूर्ती ज्या पीठावर उभी आहे त्या पीठावर दोनही बाजुस जय विजय यांचे अंकन केलेले आहे. सोलापुरातील ही एकमेव निजरुप विष्णूमूर्ती आहे असे म्हणतात. ही श्रीमूर्ती विष्णू या नावानेच ओळखते. या मंदिराला लक्ष्मीनारायण मंदिर असे म्हणत नाहीत तर श्री विष्णू लक्ष्मी मंदिर असे म्हणतात.

**लक्ष्मीनारायण मूर्ती - निजरुप मूर्ती - चाटे गल्ली , सोलापूर.**

ही श्रीविष्णूंची मूर्ती नारायण म्हणून ओळखली जाते. त्यांच्या समवेत लक्ष्मी आहे. हे लक्ष्मीनारायण मंदिर आहे. लक्ष्मीनारायणाच्या संगमरवरातील भव्य आणि सुंदर अशा या मूर्ती आहेत. समपाद अवस्थेत उभी असलेली ही चतुर्भूज विष्णूमूर्ती आहे. लक्ष्मी द्विभूज आहे. तिचा उजवा हात अभय मुद्रेत आहे ,व डाव्या हातात कमलकलिका आहे. श्रीविष्णूंच्या हातात प्रदक्षिणाक्रमाने उजव्या हातात गदा, मागील हातात पद्म, मागच्या डाव्या हातात शंख व चौथ्या डाव्या हातात चक्र अशी आयुधे आहेत. या आयुधांच्या क्रमानुसार पाहिले तर हे नारायणाचे रुप



नसून श्रीविष्णूंचेच रुप आहे. परंतु परंपरेप्रमाणे याला लक्ष्मीनारायण म्हणण्याची प्रथा पडली असली पाहिजे. अलंकरणात फक्त पायातील व हातातील तोडे दिसतात. मूर्तीच्या पोषाखामूळे व अलंकारामुळे अधिक माहिती मिळत नाही .मात्र ही मूर्ती मध्ययुगीन काळातील असली पाहिजे.

**व्यंकटेश मूर्ती - असाधारण मूर्ती - चौपाड , सोलापूर.**

चौपाडमधील व्यंकटेश मंदिर बालाजी या नावाने ओळखले जाते. डावा हात कमरेवर ठेऊन मागील हातात चक्र, शंख घेतलेल्या या विष्णूच्या रुपास बालाजी, व्यंकटेश, श्रीनिवास या

नावाने ओळखतात. जणू काही हा व्यंकटेश कमरेवर हात ठेऊन भक्तांना सांगत असतो की हा भवसागर कमरेइतकाच खोल आहे.



ही व्यंकटेशाची मूर्ती २४"रुंद असून तिची उंची ३६" आहे. काळया पाषाणात घडविलेली ही श्रीमूर्ती त्रिरथ पीठावर उभी आहे. ही स्थानकमूर्ती आहे. मूर्तीच्या पायाच्या बाजूने द्वारशाखा दिसतात. यावर नक्षीदार पानाफुलांच्या वेलींचे अंकन केलेले आहे. मध्यभागी कीर्तिमुख आहे. समपाद अवस्थेतील ही स्थानक मूर्ती आहे. प्रदक्षिणाक्रमाने उजवा हात वरदमुद्रेत आहे. मागच्या हातात चक्र आहे. मागील डाव्या हातात शंख आहे. शंख चक्रातून बाहेर पडणा-या तेजस्वी ज्वाला दिसतात. कानातील अलंकरणाचे सुंदर अंकन केलेले आहे. हातात वैशिष्टयपूर्ण तोडे दिसतात. पोषाखामुळे मुकुट व अंगावरील अलंकरण कळत नाहीत. रजपूत समाजाची ही मूर्ती मध्ययुगीन काळातील असावी असे वाटते.

**श्रीराम मूर्ती - अवतार मूर्ती - नवी पेठ , सोलापूर.**

श्रीरामांच्या अवतारातील ही श्रीमूर्ती लक्ष्मण सीतेसहित आहे. ही स्थानकमूर्ती आहे. हे मंदिर पूर्ण खाजगी असून जोगळेकरांकडे त्याची पूजा आहे. या मूर्ती दिडशे वर्षापूर्वीच्या आहेत. शके १८३९ मध्ये या मंदिराची स्थापना झाली आहे. राम - लक्ष्मण - सीतेच्या या संगमरवरी मूर्ती अतिशय मनोहर आहेत.या मूर्ती नाजूक, रेखीव व कलात्मक वाटतात. ही राम मूर्ती द्विभूज आहे. समपाद अवस्थेत उभ्या असलेल्या राम-लक्ष्मणाच्या उजव्या हातात बाण तर डाव्या हातात धनुष्य आहे . सीतेचा उजवा



हात अभयमुद्रेत आहे तर डाव्या हातात कमलकलिका आहे. अंगावरती पोषाख असल्यामूळे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

यापेक्षा जास्त काहीच बोध होत नाही. क्षत्रिय रुपातील या अवतारात निजमूर्ती इतके दागिन्यांचे अंकन मुळातच नसते.

**श्रीराम मूर्ती - अवतार मूर्ती - दक्षिण कसबा, सोलापूर.**



सोलापूरातील हे राम मंदिर जुने राममंदिर म्हणून ओळखले जाते. स्थानक अवस्थेतील संगमरवरातून बनविलेल्या जुन्या काळच्या या मूर्ती समपाद अवस्थेत उभ्या आहेत. राम हा क्षत्रिय अवतार असला तरी या मंदिरातील मूर्तींना ब्राम्हणी पध्दतीचा वेष असतो. पगडी घातलेले, उपरणे घेतलेले राम-लक्ष्मण वेगळेच दिसतात. या द्विभूज अवस्थेत असलेल्या राम-लक्ष्मण-सीतेच्या मूर्ती आहेत. या मूर्ती ब-याच जुन्या काळातील आहेत.

**श्रीराम मूर्ती - अवतार मूर्ती - दाजी पेठ , सोलापूर.**

दाजी पेठ विभाग पूर्व विभाग म्हणून ओळखला जातो. तेथील श्रीराम-लक्ष्मणाच्या या समपाद अवस्थेतील स्थानक मूर्ती आहेत. राम हा द्विभूज आहे. लक्ष्मणाच्या उजव्या हातात बाण तर डाव्या हातात धनुष्य आहे. श्रीरामांचा उजवा हात अभय मुद्रेत तर डाव्या हातात धनुष्य आहे. सीतामाईचाही उजवा हात वरदमुद्रेत आहे आणि डाव्या हातात कमलकलिका घेतलेली आहे. या मूर्ती संगमरवरी असून अतिशय मनोहारी आहेत.



राम-लक्ष्मण-सीता यांचे चेहरे स्मितमुख आहेत. मूर्ती संगमरवरात बनविलेल्या असल्या तरी अंगावर अंलकरणाचे अंकन केलेले आहे. तिघांच्याही हातात तोडे आहेत. दंडावर बाजूबंद आहेत. रामाच्या पायात तोडे दिसतात. या मूर्ती दिडशे वर्षापूर्वीच्या असाव्यात. सोलापूरात पाहिलेल्या राममूर्तींच्या मध्ये या मूर्ती अधिक रेखीव वाटतात.

**श्रीराममूर्ती - उत्सव मूर्ती - दाजी पेठ , सोलापूर.**

दाजी पेठेतीलच या रामाच्या मंदिरात उत्सवात वापरल्या जाणा-या उत्सव मूर्तीही आहेत. या मूर्ती पितळी असून अतिशय सुरेख आहेत. दररोज या मूर्तीची पूजा चालते. उत्सव मूर्तीत फक्त राम व सीता आहेत.राम-सीतेच्या या मूर्ती द्विभूज आहेत.त्यामूर्ती समपाद अवस्थेत उभ्या आहेत. पायाखाली पितळी चौकोनी नक्षीदार पीठ आहे. त्यावर या मूर्ती उभ्या आहेत. राम-सीता



मूर्तींचा उजवा हात अभय मूद्रेत आहे तर डावा हात वरद मुद्रेत आहे. दोघांच्याही डोक्यावर किरीट आहे. मूर्ती छोटया व धातूच्या असल्यामूळे अधिकच रेखीव वाटतात.

**हरिहर मूर्ती - असाधारण मूर्ती - किल्ला विभाग , सोलापूर.**

सोलापूरातील किल्ल्यात ही हरिहराची मूर्ती आहे. उजवीकडे हर तर डावीकडे हरि, अशाप्रकारच्या हरिहराच्या मूर्ती ब-याच ठिकाणी आढळतात, म्हणजे अर्धे अंग शिवाचे व अर्धे श्रीविष्णूंचे असते. पण किल्ल्यातील या मूर्तीचे वैशिष्टय म्हणजे या मूर्तीच्या मागील हातात विष्णूची आयुधे आहेत व साधारण हातात शंकराची आयुधे आहेत. त्रिभंगावस्थेतील ही स्थानक मूर्ती आहे. मूर्ती पाठशिळायुक्त आहे. पाठशिळा चौकोनीच आहे . शिळेच्या मध्यभागी कीर्तिमुख आहे व कडेने नक्षीदार महीरप आहे.



दोन्ही बाजूस चामरधारिणी आहेत. मूर्तीच्या अंगावर पूर्णतः विष्णूचेच अलंकार आहेत. प्रदक्षिणाक्रमाने उजव्या हातात डमरु आहे. मागच्या उजव्या हातात शंख आहे तर तिस-या म्हणजे मागच्या डाव्या हातात चक्र आहे. चौथा म्हणजे डावा हात खंडीत झालेला आहे. पायात

तोडे आहेत. गळयात हारयष्टी, आपादलंबिनी वैजयंतीमाला, कमरेस मेखला, कमरबंद, डोक्यावर निमुळता होत जाणारा मुकुट, कानात तांटकचक्रे आहेत. या मूर्तीत वेगळया प्रकाराने हरिहराचे ऐक्य साधले आहे.

### लक्ष्मी विष्णू मूर्ती - निजरुप मूर्ती - कलिका देवस्थान, सोलापूर.

निलगार जातीसंस्थेची ही काळया पाषाणात घडविलेली विष्णू मूर्ती आहे. इथे देवीचे पंचायतन आहे. येथील मधली मुख्य मूर्ती देवीची आहे. पंचायतनात श्रीविष्णू आहेत. ही मूर्ती अलीकडील काळातील आहे. समपाद अवस्थेतील ही स्थानक मूर्ती आहे. या मूर्तीत विष्णू चतुर्भूज तर लक्ष्मी द्विभूज आहे. प्रदक्षिणा क्रमाने हाताचा विचार केला तर उजवा हात अभय मुद्रेत आहे. मागील उजव्या हातात चक्र आहे. तिस-या म्हणजे मागील



डाव्या हातात पद्म तर चौथ्या म्हणजे डाव्या हातात गदा आहे. डोक्यावर निमुळता होत गेलेला मुकुट आहे. लक्ष्मीच्याही डोक्यावर मुकुट आहे. मूर्ती अलीकडील काळातील असल्यामुळे रेखीव वाटतात.

### हिरण्यकश्यपू निर्दालन - अवतार मूर्ती - मार्डी , ता. उत्तर सोलापूर.

सोलापूर पासून २० कि.मी. अंतरावर मार्डी हे ठिकाण आहे. या गावात ऐतिहासिक काळातील यमाई देवीच्या मंदिरातच्या आवारात दशावतारांच्या काही प्रतिमा उभ्या आहेत. यात प्रतिमा व निजमूर्ती ही आहेत.

ही नरसिंहाची आसन मूर्ती आहे. ती उग्र मूर्ती आहे. श्री विष्णूंचे हे उग्र स्वरुप आहे. हिरण्यकश्यपूचे विदरण केलेले आहे. ही नरसिंह मूर्ती पाठशिळायुक्त असून काळया पाषाणात घडविलेली आहे. मूर्ती उन्हापावसात उघडयावरच आहे. या मूर्तीतील  नरसिंह चतुर्भूज आहे. आपल्या दोन हातात तो हिरण्यकश्यपूचे पोट फाडत असल्याचे दाखविले आहे. मागच्या दोन हातात अनुक्रमे चक्र व शंख आहे व श्री विष्णू ललितासनात बसलेले आहेत. उजव्या पायाची

मांडी घातलेली असून डावा पाय खाली सोडला आहे. मांडीवर हिरण्यकश्यपूला उताणे धरले आहे. हिरण्यकश्यपूचे दोन्ही हात पाय स्पष्ट दिसतात. त्याच्या शरीरावरील अलंकाराचे अंकन स्पष्ट दिसते. डोक्यावर मुकुट , गळयातील अलंकार , कमरबंध , हातात, पायात तोडे, वस्त्राचा सोगा हे कोरीव काम सुंदर आहे. श्री विष्णूंच्या अंगावरील अलंकारही कोरीव आहेत. पायातील व हातातील तोडयात बारीक नक्षीकाम केलेले आहे. दंडावर बाजुबंद, गळयात एकावली, हारयष्टी, आपादलम्बिनी , वनमाला, यज्ञोपवित आहे. कमरेला साखळया आहेत. डोक्यावर निमुळता होत जाणारा मुकुट आहे. पाठशिळेवर खाली कोप-यात उजव्या व डाव्या बाजूला ज्या दोन मानवी प्रतिमा आहेत, त्यांच्या अंगावरील दागिन्यांचे ही बारीक कोरीव काम केलेले आहे. ही मूर्ती मध्ययुगीन काळातील असे वाटते, कारण मूर्तीचा सुबक व कोरीवपणा मूर्तीचा पाषाण यावरुन असे वाटते.



**विष्णू मूर्ती - निजरुप मूर्ती - मार्डी, ता. उत्तर सोलापूर.**

मार्डीला यमाईच्या मंदिरात ही पाच फूट उंचीची निजरुप विष्णूमूर्ती आहे. ही स्थानक मूर्ती आहे. ही विष्णूमूर्ती मध्ययुगीन असावी असे वाटते, कारण मूर्ती पाठशिळायुक्त आहे असे वाटत नाही कारण मूर्तीचे संपूर्ण अंकन केलेले आहे. मूर्तीच्या मागे असलेली महीरप पोकळ आहे. अंगावरील दागिने विशेषतः गळयातील वनमाला, कमरबंधाच्या साखळया या कोरुन काढलेल्या आहेत. किरीटाच्याजवळ कर्णभूषणे मूर्तीपासून स्वतंत्र कोरलेली आहेत. वनमाला देखील मूर्तीपासून वर स्वतंत्र कोरलेली आहे. कमरबंधाच्या साखळया वस्त्राच्या वर पोकळ कोरल्या आहेत. एकंदर मूर्ती खूपच रेखीव आहे. पण तिथले भाविक तिला तेल व हळदी-कुंकू लावण्याव्यतिरिक्त दुसरे काहीही करीत नाहीत. तेलही मूर्तीच्या काहीच भागावर दिसते.



ही निजरुप विष्णूमूर्ती समपाद अवस्थेत उभी आहे. पायाकडे पाहताना पायातील तोडे लक्ष वेधून घेतात. मात्र मूर्तीचे चारही हात खंडित झालेले आहेत. त्यामुळे हातातील आयुधाबद्दल काहीच सांगता येत नाही. कोणत्या हातात, कोणते आयुध असावे याचा काहीच अंदाज करता येत नाही. चेह-यावर शांत भाव आहे. ही योगमूर्ती असावी. डोक्यावर निमुळता होत जाणारा किरीट आहे. पुढे पट्टीवर बारीक नक्षीकाम आहे. वर मुकुटावरही बारीक नक्षीकाम आहे. कानातील कुंडले सुरेख आहेत. गळयात एकावली, हारयष्टी, यज्ञोपवित, आपादलम्बिनी वनमाला आहे. बाहुवर साखळया आहेत. हात खंडीत झालेले असले तरी दंडावरील नक्षीदार केयूर दिसतात. पोटावर उदरबंध आहे. कमरबंधाला नाजुक साखळया आहेत. पायाच्या दोन्ही बाजूस मानवी प्रतिमा आहेत. त्या श्रीलक्ष्मी आणि सरस्वती असाव्यात. मूर्तीच्या मागची महीरप अतिशय बारीक काम केलेली व पोकळ आहे. महीरपीच्या मध्यभागी कीर्तिमुख आहे. मूर्ती खालील पीठ त्रिरथपीठ आहे.

### विष्णू मूर्ती - निजरुप मूर्ती क्र.१ व २ - मार्डी, ता. उत्तर सोलापूर.

मार्डीला यमाईच्या मंदिरात अजून दोन छोटया शिळावर स्थानक निजरुप विष्णूमूर्ती आहेत. या मूर्ती थोडया ओबडधोबड वाटतात. या मूर्ती जवळ जवळच ठेवलेल्या आहेत. मंदिराच्या आवारातच पण थोडया शेडखाली आहेत. मंदिराच्या बाहेर पाठभिंतीत आहेत. त्यांची पूजा रोज होते की नाही सांगणे अवघड आहे.

### विष्णू मूर्ती क्र.१



या मूर्तीची पाठशिळा शिरोभागी त्रिकोणी आहे. मध्ययुगीन मुर्तीत पाठशिळेवर अंकन केलेले असून मागची शिळा डोक्याभोवती थोडी उंच असते. तशी ही शिळा दिसते. श्रीमूर्ती समपाद अवस्थेत उभी आहे. पाठशिळा जमिनीत गेल्यामुळे पाय जमिनीवर दिसतात. पायात मोठे तोडे आहेत. प्रदक्षिणा मार्गाने उजवा हात अभय मुद्रेत आहे. मागच्या हातात शंख आहे. डाव्या मागच्या हातात चक्र आहे तर साधारण डावा हात गदेवर स्थिरावला आहे. शरीरावर नेहमीप्रमाणेच अंलकरणे आहेत. गळयात गळसरी, यज्ञोपवित वैजयंतीमाला, कमरबंध, हातात तोडे, डोक्यावर मुकुट ,कुंडले हे सर्व अंकन दिसत

आहे. विष्णूची मोठी मूर्ती रेखीव आहे तशी ही रेखीव नाही पण समकालीनच असावी, कारण या एकाच वेळी तिथे ठेवलेल्या असाव्यात असे त्यांच्या ठेवण्याच्या पध्दतीवरुन वाटते.

**विष्णू मूर्ती क्र.२**

वरच्या मूर्तीशेजारीच ही विष्णूमूर्ती आहे. हिची पाठशिळा चौकोनी आहे. मूर्तीचा डावा



भाग थोडा खंडीत झाला आहे. समपाद अवस्थेत उभी असलेली ही विष्णूची मूर्ती आहे. प्रदक्षिणाक्रमाने उजव्या हातात गदा आहे. मागच्या उजव्या हातात शंख आहे. डाव्या मागच्या हातात चक्र आहे. खालचा डावा हात खंडीत झालेला आहे. अंगावर अंलकाराचे अंकन सुंदर आहे. पायात मोठे नक्षीदार तोडे आहेत. हातातही तोडे आहेत. बाजूवर बाजूबंद आहेत. गळयात यज्ञोपवित आहे. हारयष्टी ,अपादलम्बिनी वनमाला आहे.दंडावर केयूर आहेत, पोटावर उदरबंध आहे. कमरेवर कमरबंध , मेखला आहेत. मेखल्याच्या साखळया लांबवर रुळत आहेत. डोक्यावर मुकुट आहे. मूर्तीची तोडफोड झालेली आहे. तसेच ही मूर्ती थोडी ओबडधोबडही आहे तरीपण मूर्ती चांगली वाटते. पाठशिळेच्या खालच्या बाजूला डाव्या व उजव्या बाजूस पायाशी श्रीलक्ष्मी व सरस्वती दिसतात.

**विठ्ठलमूर्ती - असाधारण मूर्ती - मार्डी, ता. उत्तर सोलापूर.**

मार्डीला निजरुप विष्णूच्या दोन प्रतिमा उभ्या आहेत. त्याच्या शेजारीच ही अवतार मूर्ती आहे. ही विठ्ठल मूर्तीही बाकीच्या मूर्तीच्या समकालीनच असावी, कारण पाषाणाचा प्रकार तसाच आहे. पाठशिळेची घडणही तशाच प्रकारची आहे. पाठशिळा शिरोभागी त्रिकोणी आहे, मात्र या पाठशिळेवर श्रीविठ्ठलाच्या डोक्याच्या मागे संपूर्ण नक्षीदार अंकन केलेले आहे, त्यामुळे मूर्तीची सुबकता वाढली आहे. ही श्रीविठ्ठलाची मूर्ती रेखीव आहे. समपाद अवस्थेत उभी असलेली ही योगरुढ मूर्ती



आहे. पाठशिळेच्या खालचा भाग जमिनीत गेलेला असल्यामुळे या मूर्तीचे तोडयाच्या खालचे पाय दिसत नाहीत. बाकी अंगावरचे अंलकार उठावदार आहेत. हातात तोडे आहेत. गळयात हारयष्टी, बाहूबंद , गळयात वैजयंतीमाला आहे. डोक्यावर निमुळता होत जाणारा मुकुट आहे.

कानात सुंदर मकरकुंडले आहेत. वस्त्राचा सोगा लोंबताना दिसतो. अशी कटयावलंबीत श्री विठ्ठलाची मूर्ती आहे. उजव्या हातात पद्म आहे. तो हात पद्मासहीत कमरेवर ठेवलेला आहे. डाव्या हातात शंख असून या शंखाच्या पोकळीत बोटांनी धरलेले आहे. या शंखासहीत हात कमरेवर ठेवलेला आहे. जणू हा भवसागर कमरेएवढाच खोल आहे, असेच तो सांगतो आहे. या मूर्तीला पाहिल्यावर पंढरपूरच्या विठ्ठलाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

**विष्णूमूर्ती - निजरुप मूर्ती - वेळापूर, ता. माळशिरस.**



वेळापूर गावाची अशी ख्याती आहे की आजही या गावात घरासाठी पाया खोदला तर पाषाणाचे अवशेष सापडतात. कधी ते भग्न अवस्थेत असतात तर कधी चांगल्या अवस्थेत. या पाषाणात काही विशिष्ट चित्रकृती असलेले एकाच साच्यात घडविल्यासारखे वाटणारे काही सपाट शिलाखंड मोठया संख्येने सापडतात. ब-याच वेळा मूर्तीही सापडतात. हे अवशेष कशाचे आहेत, कुठल्या काळातील आहेत हे नक्की सांगता येत नाही. मात्र हे अवशेष शासनाने एकत्रित ठेवून एक संग्रहालय बनविलेले आहे. याच संग्रहालयात या दोन विष्णू मूर्ती आहेत.

संग्रहालयात असलेली ही मूर्ती पाहिली तर ती बरीच प्राचीन असावी असे वाटते. वेळापूर परिसरातील मूर्तीचा दगड एका विशिष्ठ प्रकारचा आहे तो काळा कुळकुळीत नाही. लालसर पांढरटपणा त्या दगडात दिसतो पण तो पुरुंदाचाही नाही. शिल्प थोडे ओबडधोबड आहे, प्राचीन आहे. कधी सापडले, कुठे सापडले ते कोणी सांगू शकत नाही. यातील ही विष्णूमूर्ती समपाद अवस्थेत उभी आहे. ही स्थानक मूर्ती आहे. मूर्ती चतुर्भूज असून सर्व अलंकरणांनी युक्त आहे. प्रदक्षिणाक्रमाने उजवा हात अभय मुद्रेत आहे. मागच्या उजव्या हातात शंख आहे. तिस-या म्हणजे मागच्या डाव्या हातात चक्र आहे व चौथ्या म्हणजे डाव्या हातात गदा असून गदेवर श्री विष्णूंचा हात टेकलेला आहे. मूर्ती पाठशिळायुक्त आहे. शिळा डोक्याच्या वर त्रिकोणी आहे. पाठशिळेचा दगड डोक्याच्या थोडयावरती निमूळता होत गेलेला आहे. मूर्तीच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

अंगावर जी अलंकरणे दिसतात, ती खुपशी रेखीव नाहीत. पायात तोडे आहेत. हातात तोडे आहेत. गळयात हारयष्टी व आपादलम्बिनी वनमाला, कानात कानात कुंडले एवढेच अंलकार आहेत. डोक्यावरील मुकुट विशिष्ट आहे, कारण त्याच्या मागे वलय अंकन न करता वेगळयाच म्हणजे मुकुटाचा आकार दाखविला आहे. वस्त्राचा सोगा पायात दिसतो. पायाशी श्रीलक्ष्मी आहे. श्रीमूर्तीच्या चेह-यावरील भाव सांगता येत नाही, कारण मूर्तीचे घर्षण झालेले आहे , त्यावरुन ही मूर्ती काही काळ उन्हापावसात असावी . कालातंराने काही काळ जमिनीत दडपली गेली असावी व कुठेतरी पायाच्या उत्खननात मिळाली म्हणून ती आज संग्रहालयात उभी आहे.

**विष्णूमूर्ती - निजरुप मूर्ती - म्हाळूंग, ता. माळशिरस**

वेळापूरपासून काही अंतरावर म्हाळूंग हे गाव आहे. वेळापूर लगतच असल्यामूळे त्याही



गावात थोडे खणले तरी असे पाषाण अवशेष सापडतात. येथील अवशेष देखील वेळापूरच्याच संग्रहालयात ठेवलेले आहेत. दोन दालने आहेत, त्यातील एका दालनात म्हाळूंगच्या मूर्ती ठेवल्या आहेत. त्यात ही मूर्ती आहे, म्हणून तिला म्हाळूंगची म्हणायचे. बाकी ही मूर्ती कुठे, कधी, कशी मिळाली ते सांगता येत नाही. श्रीमूर्ती कडे पाहिले तर ती प्राचीन असावे असे वाटते. याला आणखीही एक कारण आहे, ते म्हणजे मूर्तीत कमळाचे अस्तित्व दिसत नाही. मूर्तीचा पाषाण घर्षण झालेला आहे. समपाद अवस्थेत उभी असलेली ही स्थानक मूर्ती आहे. ही श्रीमूर्ती पाठशिळायुक्त आहे. अर्धउठावातील ही मूर्ती तेवढी रेखीव नाही. मूर्तीच्या अंगावर अलंकरणे आहेत पण दगडाच्या पृष्ठभागाची झीज झाल्यामुळे ती उठावदार दिसत नाही. प्रदक्षिणाक्रमाने उजवा हात अभय मुद्रेत आहे. मागच्या उजव्या हातात शंख आहे. मागील डाव्या हातात चक्र व डाव्या हातात गदा असा हा आयुधक्रम आहे. कटिवस्त्राचा सोगा दोन्ही पायाच्या मध्ये दिसतो. वेळापूरच्या मूर्तीपेक्षा या मूर्तीतील आयुधे सुबक आहेत. पाषाणही थोडा वेगळा आहे. पण काळा नाही. पायाची ठेवणही वेगळी आहे. आपादलम्बिनी वनमाला दिसत नाही. कमरेस मेखला कटिबंध आहे. गळयात हारयष्टी , पायात तोडे आहेत. निमुळता होत

जाणारा मुकुट आहे. हा मुकुट वर एकदम निमुळता होत गेलेला आहे. उजव्या पायाशी श्रीलक्ष्मी आहे. एकंदर मूर्तीची ठेवण पाहिली की, त्या पाषाणावरुन ती प्राचीन असावी असे वाटते.

**व्यंकटेशमूर्ती - असाधारण मूर्ती - सांगोला.**



मागील दोन हातात शंख व चक्र असलेली उजवा हात वरदमुद्रेत तर डावा हात कटयावलंबीत, अशी श्री विष्णूची मूर्ती बालाजी, श्रीनिवास, व्यंकटेश या नावाने ओळखतात. सांगोला येथील ही बालाजी मूर्ती थोडीशी वेगळी आहे. ही मूर्ती पाठशिळायुक्त नाही. मागे कमान आहे. कमानीवर वरती सूर्य, चंद्राचे अंकन केलेले आहे. पाठशिळा नाही म्हटले तर चारही हात पाठशिळेवरच आहेत. पाठशिळेवर डाव्या व उजव्या बाजूस चामरधारीणी आहेत. ही स्थानक मूर्ती काळया पाषाणात घडविलेली आहे.

प्रदक्षिणाक्रमाने या श्रीमूर्तीचा उजवा हात वरद मुद्रेत आहे. उजव्या मागच्या हातामध्ये चक्र आहे तर डाव्या मागच्या हातामध्ये शंख आहे व चौथा म्हणजे डावा हात कल्यावलंबीत नसून या हातात गदा आहे. त्याखेरीज या मूर्तीच्या चेह-यावरील भाव किंवा या व्यंकटेश मूर्तीचा चेहरा देखील वेगळा आहे. या ठिकाणची मूळ मूर्ती दिडशे ते दोनश वर्षापूर्वीची होती. ती मूर्ती जास्त जुनी झाल्यामुळे भग्न झाली व त्या ठिकाणी पुन्हा स्थापन करण्यासाठी ही मूर्ती पंढरपूरहून घडवून आणली अशी माहिती मिळाली. हे मंदिर खाजगी मालकीचे आहे. कदाचीत मूर्ती पंढरपूरला घडविली गेल्यामूळे तेथील कलाकाराने विठ्ठलमूर्ती सदृष्य हा चेहरा घडविला असावा. त्यामुळे या मूर्तीच्या चेह-यावरील भाव विठ्ठलमूर्ती प्रमाणेच दिसतात. हे जरी अनवधानाने झाले असले तरी आज हेच या मूर्तीचे वेगळेपण ठरले आहे. त्यामूळे हे मूर्तीचे पीठ जरी जुने असले तरी ही मूर्ती फारशी जुनी नाही.

## श्रीराम मूर्ती - अवतार मूर्ती , सांगोला.

श्रीरामाची ही मूर्ती समपाद स्थानक मूर्ती आहे. रामासमवेत लक्ष्मण व सीता आहे.



राममूर्ती द्विभूज असून निरायुध आहे. या राम लक्ष्मण सीतेच्या मूर्तीचे हात समोर असून हातात काही आयुध धरण्याच्या स्थितीत दिसतात. आयुधे मूर्तीत घडविलेली नाही. बहुधा हातात धनुष्य बाण धरता येथील अशा अवस्थेत हाताची बोटे आहेत. या मूर्ती संगमरवरी दगडात घडविलेल्या आहेत. हेही मंदिर खाजगीच आहे. मंदिरातील या मूर्ती मध्ययुगीन असाव्यात असे वाटते. मूर्ती नयनरम्य ,मनोहर, प्रमाणबध्द वाटतात.

## विष्णूमूर्ती - निजरुप मूर्ती - हीरज, ता. मोहोळ.

हीरज या गावात हेमाडपंथी देवीचे जुने मंदिर आहे. अशी अख्यायिका सांगतात कि त्या मंदिरातील देवी पळवून नेत होते.परंतु गावक-यांनी वेशीपर्यंतच त्या लोकांना पकडले. हे जुने हेमाडपंथी मंदिर गावाच्या बाहेरच आहे. मग गावक-यांनी गावातच मंदिर बांधून त्या मूर्तीची तिथे स्थापना केली. त्या गावातील मंदिराजवळ एक विष्णूची निजमूर्ती बाहेरच आहे.



श्रीविष्णूंची ही अतिशय प्राचीन मूर्ती उपेक्षित अवस्थेत आहे. ही मूर्ती पाठशिळायुक्त असून मूर्तीचा बराचसा भाग भग्न झालेला आहे. पाठशिळा डोक्यावर त्रिकोणी आहे. पाठशिळेवर नक्षीकाम केलेले आहे. ही समपाद अवस्थेत उभी असलेली विष्णूंची स्थानक मूर्ती आहे. समपाद अवस्थेत उभी आहे पण खाली पायाचा भाग भग्न झालेला आहे. मूर्ती चतुर्भूज आहे पण एकाच हातात आयुध शिल्लक आहे. मूर्तीच्या खालचा उजवा हात खंडित झालेला आहे. मागच्या उजव्या हातात शंख आहे. डाव्या बाजूचा मागचा हात दिसतो पण हातात आयुध दिसत नाहीत. चौथा म्हणजे खालचा डावा हात खंडित झालेला आहे. अंगावरील अलंकरणे मात्र स्पष्ट दिसतात. डोक्यावर निमुळता

होत जाणारा मुकुट आहे. मुकुटाला विशिष्ट अशी बारीक नक्षीकामाची पट्टी आहे. मुकुटावरील नक्षीकाम ही मूर्ती प्राचीन असावी हे सांगते. हातात तोडे दिसतात. गळयातही अलंकरणे आहेत. उदरबंध, कटिबंध, मेखला, आपादलम्बिनी वनमाला ही अलंकरणे आहेतच. या मूर्तीमूळे हिव-याच्या मूर्तीची आठवण होते.

**विठ्ठलमूर्ती - असाधारण मूर्ती क्र. १ दामाजी मंदिर, मंगळवेढा.**



संत दामाजीपंताचे जीर्णोध्दार केलेले भव्य सभामंडप असलेले हे मंदिर आहे. त्याच्या गाभा-यामध्ये मूळ मूर्ती विठ्ठल-रुक्मिणीची आहे. आणि त्याचबरोबर दामाजींची कटिवर हात ठेवून समपाद अवस्थेत उभी असलेली मूर्ती आहे. ही मूर्ती थोडया बाजूला आहे. विठ्ठलाची ही योगमूर्ती आहे. देश तशा वेश या न्यायाने विठ्ठलाला संतांचा पोशाख केलेला असतो.

**विठ्ठलमूर्ती क्र. २**



दामाजी मंदिराचा जीर्णोध्दार होवून भव्य मंदिर झालेले आहे. त्याच्या मागच्या बाजूस जुने मंदिर आहे. त्या मंदिरातही विठ्ठलाची रुक्मिणीसह समपाद अवस्थेत उभी असलेली योगमूर्ती आहे. युगे अठ्ठाविसे विटेवर उभा असलेला हा विठ्ठल आजही भक्तांसाठी उभा आहे. मध्ययुगीन काळातील या मूर्ती आहेत.

**श्रीराममूर्ती - अवतार मूर्ती,**

**मंगळवेढा.**



संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणा-या मंगळवेढयात जगताप गल्लीत ही राममूर्ती आहे. रामासमवेत लक्ष्मण व

सीतेच्याही मूर्ती आहेत. ही अवतार मूर्ती आहे. मूर्तीतील राम द्विभूज आहे. समपाद अवस्थेत उभा आहे. उजव्या हातात बाण आहे व डाव्या हातात धनुष्य आहे. लक्ष्मणाच्याही उजव्या हातात बाण व डाव्या हातात धनुष्य आहे. सीतेचे मात्र दोन्ही हात समोर आहेत. तिच्या हातात फळसदृष्य काहीतरी दिसते आहे, काय ते कळत नाही.

**लक्ष्मीनारायण निजमूर्ती , मंगळवेढा.**



ही लक्ष्मीनारायण अशी निजमूर्ती आहे. परंतु गावात ही मूर्ती मुरलीधर म्हणून प्रसिध्दआहे. समपाद अवस्थेत उभी असलेली ही स्थानक मूर्ती आहे. समवेत लक्ष्मीही आहे. लक्ष्मीचा उजवा हात अभयमुद्रेत आहे व डाव्या हातात कमलकलिका धरलेली आहे. पाय समपाद अवस्थेत आहेत. या मूर्ती संगमरवरी आहेत. मूर्ती खरोखरच विलोभनीय आहेत. श्रीविष्णूंची ही चतुर्भूज मूर्ती आहे. कडेला असलेल्या महीरपीच्यावरती मध्यभागी कीर्तिमुख आहे. प्रदक्षिणाक्रमाने उजव्या हातात गदा व मागील उजव्या हातात चक्र, तिस-या म्हणजे मागील डाव्या हातात शंख आहे व चौथ्या म्हणजे डाव्या हातात पद्म आहे. मूर्ती संगमरवरी असल्यामूळे अंगावर अलंकारांचे फारसे अंकन नाही. हातात तोडे दिसतात. मूर्तीच्या डोक्यावर मूर्तीत कोरलेला मुकुट आहे की नाही ते कळत नाही. चेह-यावर शांत भाव आहे. संगमरवरामुळे मूर्ती अगोदरच सुंदर दिसते, त्यामुळे बाकीच्या दागिन्यांचे अंकन नाही हे लक्षातही येत नाही. मूळातच ही मूर्ती अतिशय रेखीव आहे. मूर्ती मध्ययुगीन आहे.

**विष्णूमूर्ती - निजरुप मूर्ती, मंगळवेढा.**



या मूर्तीची अवस्था पाहिली तर ही मूर्ती अतिशय प्राचीन वाटते. अतिशय झिजलेली ही विष्णूमूर्ती तहसील कार्यालयाच्या बाहेर, रेवणसिध्द मंदिराच्या बाहेरच्या परिसरात आहे. तुळशीवृंदावनाला टेकून उभी केलेली आहे. आज या मूर्तीसंवर्धनासाठी कोणताही प्रयत्न केला जात नाही असे दिसते. ही मूर्ती चतुर्भूज आहे. पण मूर्तीचे चारही हात खंडित झालेले आहेत, त्यामुळे आयुधे कोणती आहेत ते सांगता येत नाहीत. समपाद अवस्थेत उभी असलेली ही

स्थानक मूर्ती आहे. ही योगमूर्तीच म्हणावी लागेल पण चेह-यावरील भाव टिपता येत नाही, कारण चेहरा पूर्णपणे झिजलेला आहे. परंतु डोक्यावरील निमुळता होत जाणारा नक्षीदार किरीट व गळयातील अपादलम्बिनी वनमाला विष्णूची साक्ष देतात. मूर्ती झिजलेली असली तरी अंगावरील अलंकरणे स्पष्ट दिसतात. दोन्ही पायाच्या मध्ये धोतराचा सोगा दिसतो. पाठशिळेवर पायाशी श्रीलक्ष्मी व सरस्वती दिसतात. मूर्ती बरीच प्राचीन असावी.

**श्रीराममूर्ती - अवतार मूर्ती , माळशिरस.**



माळशिरस गावाचे ग्रामदैवत हनुमान आहे. या हनुमान मंदिरातच श्रीराममूर्ती आहे. श्रीराममूर्ती समवेत लक्ष्मण सीतेच्याही मूर्ती आहेत. श्रीरामांच्या पुढे म्हणजे समोर हनुमान आहे. मंदिरात मुख्य मूर्ती ही हनुमानाची आहे, परंतु रामसेवक म्हणूनच त्याला ओळखतात. श्रीराम लक्ष्मण, सीतेच्या समपाद अवस्थेत उभ्या असलेल्या या द्विभूज मूर्ती आहेत. या मूर्ती संगमरवरी आहेत, त्यामुळे त्या सुंदर दिसतात. श्रीरामांचा उजवा हात अभयमुद्रेत आहे तर डाव्या हातात धनुष्य आहे. लक्ष्मणाच्या उजव्या हातात बाण आहे व डाव्या हातात धनुष्य आहे. सीतेचा डावा हात अभयमुद्रेत आहे तर उजव्या हातात कमलकलिका आहे. तिन्ही मूर्तीच्या डोक्याभोवती प्रभामंडळ आहे. मूर्ती संगमरवरी असल्यामुळे अंगावर फारशी अलंकरणे कोरलेली नाहीत. हातात तोडे दिसतात.

**श्रीविठ्ठलमूर्ती - असाधारण मूर्ती , माळशिरस.**

माळशिरसमधील श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे हे प्रसिध्द मंदिर आहे. वामांगी रखूमाई विटेवर



उभा अशी ही मूर्ती आहे. श्रीविठ्ठलाची काळया पाषाणातील समपाद अवस्थेत उभी असलेली ही योगमूर्ती आहे. विठ्ठलमूर्तीचे हात कटयावलंबीत आहेत. कानात मकरकुंडले, पायातील तोडे यापेक्षा अधिक अलंकरणे सांगता येत नाहीत. मूर्ती काळया पाषाणातीलच असली तरी चमकदार व घोटीव आहे. रुक्मिणी ही कमरेवर हात ठेवलेली , समपाद अवस्थेत उभी आहे. मूर्ती कुठल्या काळातील आहे ते नक्की कळत नाही.

**श्रीकृष्णमूर्ती - अवतार मूर्ती - श्री क्षेत्र कुडलसंगम, ता. उत्तर सोलापूर.**



हिंदू धर्मपरंपरेत दोन नद्यांचा संगम असलेल्या ठिकाणाला विशेष महत्व आहे. असे ठिकाण म्हणजे कुडल. येथे अतिशय कलापूर्ण व नयनमनोहर मूर्ती व शिल्पांनी परिपूर्ण असे हरिहरेश्वराचे मंदिर आहे. शहाण्णव सालापर्यंत हे मंदिर भीमानदीला झालेल्या महापूरात बुडालेले होते. ही गोष्ट प्रा. भिडे यांनी लक्षात आणून दिली. आपल्या परिसरात असलेल्या या प्राचीन कलापूर्ण मंदिराच्या रक्षणाची जाणीव झालेल्या कुडल, हत्तरसंग वासीयांनी सुधारणा समितीची स्थापना केली. कालांतराने जीर्णोध्दाराने हे मंदिर वर काढले. या मंदिराच्या उत्खननात मंदिराच्या मागील बाजूस माती काढताना अखंडित श्रीकृष्णाची मूर्ती मिळाली आहे.

ही श्रीकृष्ण मूर्ती काळया पाषाणाची असून अतिशय विलोभनीय आहे. मूर्ती त्रिभंगावस्थेत उभी आहे. श्रीकृष्णाच्या हातात बासरी आहे आणि डोक्यावर टोप आहे. या श्रीकृष्णाची वेशभूषाही अतिशय कलात्मक आहे. मूर्तीवर केलेले अलंकारांचे अंकन देखील वैशिष्टयपूर्ण आहे, कारण हे अलंकार अतिशय कलात्मकतेने दाखविलेले आहेत. त्यात पायात पैंजण, बाजूबंद, हातात तोडे ही अलंकरणे आकर्षक दिसतात. आपादलम्बिनी वनमाला आहे. ही मूर्ती पाठशिळायुक्त आहे. पायाशी गाय , वासरु दाखविले आहे.

**श्रीविष्णूमूर्ती - निजरुप मूर्ती, बार्शी.**



श्रीविष्णूंची मंदिरे ठिकठिकाणी आहेत, परंतु भगवंत या नावाने प्रसिध्द असलेले विष्णूमंदिर अखिल भारतात केवळ बार्शी येथेच आहे. पंढरपूरला जसे पुंडलिका भेटी परब्रम्ह आले तद्वतच भक्तश्रेष्ठ अंबरीषासाठी भगवान विष्णूचे आगमन झाले. राजा अंबरीषाच्या "साधन द्वादशी " व्रतावरुन या नगरीला बार्शी हे नाव पडले. द्वादशी म्हणजे बारस. त्यावरुनच बारसपूर- बारशी -बार्शी असे नाव पडले. याशिवाय अंबरीषविजय नामक ग्रंथात ओव्यांमध्ये बारशीतील बारा पवित्र तीर्थांची नावे येतात. बारा पवित्र तीर्थांचे गाव बाराशिव

यावरुनही बार्शी हे नाव मिळाले असावे. परंपरेप्रमाणे आजही पंढरपूरला एकादशी करुन बार्शीस द्वादशी सोडण्याचा वारक-यांचा प्रघात आहे.

हीं श्रीभगवंताची मूर्ती स्थानक अवस्थेतील आहे. मूर्ती शाळीग्राम पाषाणाची आहे. ही मूर्ती अत्यंत सुबक आहे. अत्यंत गुळगुळीत आकर्षक असलेल्या या मूर्तीच्या मस्तकावर शंकराची पींडी आहे. पंढरपूरप्रमाणेच येथेही शिवविष्णूचे ऐक्य दिसते. समपाद अवस्थेत उभ्या असलेल्या भगवंताच्या उजव्या हाताखाली हात जोडलेल्या अवस्थेत भक्त अंबरीष आहे. भगवंताची मूर्ती ज्या शिळेची आहे त्याच शिळेत भगवंताच्या पाठीशी टेकून उलट दिशेस तोंड केलेली लक्ष्मीची मूर्ती आहे. समोरुन ही मूर्ती विष्णूची तर पाठीमागून लक्ष्मीची आहे हे या मूर्तीचे वैशिष्टय आहे. ही मूर्ती चतुर्भूज आहे. प्रदक्षिणाक्रमाने उजवा हात वरदमुद्रेत आहे. हा हात अंबरीषाच्या डोक्यावर ठेवलेला आहे. हा हातच पद्म समजतात. मागच्या उजव्या हातात चक्र आहे तर तिस-या म्हणजे मागच्या डाव्या हातात शंख आहे व चौथ्या डाव्या हातात गदा आहे मूर्ती अलंकरणयुक्त आहे. छातीवर भृगुऋषींच्या पावलाची खूण आहे.

**विष्णूमूर्ती (नारायण मूर्ती) निजरुप मूर्ती - कारी , ता. बार्शी.**

बार्शी तालुक्यातील कारी हे ठिकाण. कारी हे गाव पूर्वी बाजारपेठेसाठी प्रसिध्द होते.



गावाभोवती पंधरा फूट उंचीची दगडी भिंत होती असे म्हणतात. या गावातील बाराव्या शतकातील हेमाडपंथी महादेवाचे मंदिर प्रसिध्द आहे. तसेच प्राचीन स्थापत्यकलेची साक्ष देणारी अनेक मंदिरे आहेत. त्यामध्ये श्रीविष्णूंचे नारायण मंदिर नावाने ओळखले जाणारे एक मंदिर आहे. या मंदिरातील नारायणाची म्हणजे श्रीविष्णूंची अतिशय प्राचीन अशी मूर्ती आहे. ही मूर्ती पाठशिळायुक्त आहे. समपाद अवस्थेत उभी असलेली ही विष्णूमूर्ती आहे. मुद्रेवर सात्विक भाव असलेले ही योगमूर्ती आहे. द्विभूज विष्णूमूर्ती फार कमी प्रमाणात आढळतात. ही नारायणाची मूर्ती द्विभूज आहे. या मूर्तीची पाठशिळा डोक्यापेक्षा थोडी उंच असून शिरोभागी त्रिकोणी आहे. पाठशिळेवर पायाशी चामरधारिणी आहेत. बाकी पाठशिळेवर बारीक नक्षीकाम केलेले आहे. हे शिल्प अतिशय सुबक व प्राचीन आहे. मूर्ती

पूर्णतः अलंकृत आहे. गळयात रुळणारी आपादलम्बिनी वैजयंतीमाला आहे.यज्ञोपवित आहे. कमरेला कमरबंध ,मेखला आहे. गळयात हारयष्टी आहे. डोक्यावर निमुळता होत जाणारा नक्षीदार मुकुट,बाहूभूषणे आहेत. वस्त्राचा सोगा दोन्ही पायात दिसतो. मूर्ती द्विभूज आहे पण मूर्तीचे दोन्ही हात खंडित झालेले आहेत त्यामुळे हातात कोणती आयुधे आहेत ती कळत नाहीत.

**विठ्ठलमूर्ती - असाधारण मूर्ती , पंढरपूर.**



विठ्ठलाचे स्थान म्हणून पंढरपूर हे शहर यादवकाळात अधिक प्रसिध्दीस आले असले तरी त्याचे अस्तित्व राष्ट्रकु ट काळातही होते. याला पुरावा म्हणून म्हैसूर सरकारच्या पुरातत्व विभागाने १९१९ साली प्रसिध्द केलेल्या इ.स.५१६ मधील ताम्रपटाचा उल्लेख केला जातो. या ताम्रपटात राष्ट्रकूट अविधेय याने जयदिठ्ठ नावाच्या ब्राम्हणास पांडरगपल्ली हे गाव दान केल्याचा उल्लेख आला आहे. पांडरगपल्ली हे नाव पांडुरंगावरुन पडले असे काहींचे मत आहे तर पंडरगे या ग्राम नावावरुन विठ्ठलाचे पांडुरंग असे नाव पडले असावे असाही तर्क केला जातो. माझ्या नावाने हे क्षेत्र विख्यात व्हावे असे पुडंलीक म्हणतो तर हे ब्राम्हणा, मी तुझे नाव धारण करणा-या या क्षेत्री सर्वदा वास करेन असे देवानेच खुद्द पुंडलिकाला अश्वासन दिले आहे असे विविध मते मांडली जातात. पंढरपूर हे वारक-यांचे प्रमुख तीर्थक्षेत्र झाले आहे.

पांडुरंग पंढरीनाथ, विठोबा, विठ्ठल आणि शेवटी विठूमाऊली म्हणून सर्वांची मने व्यापून टाकणारे महाराष्ट्राचे हे एक प्रमुख दैवत. ' विष्णू ' या नावावरुन विठ्ठल हे रुप तयार झाले आहे. विठ्ठल हा शब्द विष्णू या शब्दाचे अपभ्रंश असल्याचे बहुतेक विद्वानांना मान्य आहे. पंढरपुरात आज जी विठ्ठलमूर्ती उभी आहे ती काळया पाषाणातील स्थानकमूर्ती आहे. समपाद अवस्थेत उभी असलेली ही योगमूर्ती आहे. मूर्तीची पाऊले एका चौकोनावर आहे त्याला वीट म्हणतात. विटेखाली उलटे कमळ आहे. कमरेला वस्त्र असल्याच्या खुणा, दोन पायामधील दगडी भाग वस्त्राचा सोगा असल्यासारखा दिसतो त्यावरुन ओळखतात. कमरेला तिहेरी मेखला

आहेत.मूर्तीचे हात कटयावलंबीत आहेत. उजव्या हातात आखूड कमलनाल असून तो हात कमरेवर उताणा ठेवला आहे. हातात व पायातही तोडे आहेत. दंडावर केयूर आहेत. गळयात हारयष्टी, यज्ञोपवित आहे. छातीवर श्रीवत्सचिन्ह आहे. कानात माशाच्या आकाराची कुंडले असून ती खांदयावर आडवी आहेत. मूर्तीच्या डोक्यावर कंगोरेदार टोपीसारखा साधा मुकुट आहे. पुजारी यालाच शिवलिंग म्हणतात व कंगो-याला पाठीवर टाकलेली गवळीपणाचे द्योतक शिंक्याची दोरी म्हणतात.अर्थात या गोष्टी पटत नाहीत. वारकरी संप्रदाय हा हरिहरैक्याची उदात्त भावना उराशी बाळगणारा एक समन्वयवादी उपासना पंथ म्हणून ओळखला जातो.

**विठ्ठलमूर्ती - अवतार मूर्ती , माढा.**

माढयाची ही विठ्ठलमूर्ती पंढरपूरच्या विठ्ठलाचीच प्रतिकृती आहे. अफझलखानाच्या



आक्रमणाच्या वेळी पंढरपूरची विठ्ठलमूर्ती वीस मैलावर असलेल्या माढा या ठिकाणी हलविण्यात आली होती असे म्हणतात. याविषयी एकमत नाही. पंढरपूरहून विठ्ठलमूर्ती माढयात काही काळ ठेवली असेल आणि पुन्हा ती पंढपुरला हलविली असेही म्हणतात. म्हणजे मूळ मूर्ती परत पंढरपूरला नेली, याविषयी एकमत नाही. परंतु आज माढयाला जी विठ्ठलमूर्ती उभी आहे, ती करकटीवर ठेवलेल्या विटेवर उभ्या असलेल्या पंढरपूरच्या विठ्ठलाचीच प्रतिकृती आहे पण माढयातील मूर्तीच्या वक्षस्थलावर जो मंत्र आहे तो पंढरपूरच्या मूर्तीच्या छातीवर नाही. त्यामुळे मुख्य मूर्ती कोणती हा वाद आहे. मूर्तीशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार करता एक छातीवरील मंत्र सोडला तर पंढरपूरच्याच विठ्ठलाचे वर्णन करावे लागेल.

**नरसिंह - अवतार मूर्ती - नीरानरसिंहपूर.**

सोलापूर पुण्याच्या सीमारेषेवर असलेले नीरानरसिंहपूर हे ठिकाण. नरसिंह अवतारासाठी प्रसिध्द आहे. नरसिंह हे या गावाचे ग्रामदैवत. हे गाव नरसिंहपूर या नरसिंहाच्या नावानेच प्रसिध्द आहे. श्रीविष्णूंच्या अवतार कथात नृसिंहावताराचे महत्वपूर्ण स्थान आहे. ईश्वर अणुरेणूतून व्यापून राहिला आहे. हे शास्त्रीय सत्य नाकारणा-या हिरण्यकश्यपूला त्याच ईश्वराने नृसिंहरुपाने ठार केले. श्रीक्षेत्र नीरानरसिंहपूर हे प्राचीन देवस्थान आहे. पद्मपुराणाच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

बाराव्या अध्यायात याचे वर्णन केलेले आहे. सध्याच्या मंदिराच्या उत्तरेस लागून असलेल्या तरटीच्या झाडाच्या ठिकाणी श्रीनृसिंहमूर्ती पूर्वाभिमूख होती. ती नव्या मंदिरात पश्चिमाभिमुख अधिष्ठित आहे. तरटी वृक्षाखाली श्रीमूर्तीच्या पादूकास्थापन केलेल्या असून हे स्थान तरटी नृसिंह म्हणून प्रज्ञात आहे.

प्रत्यक्ष नृसिंहमूर्ती पाहताना ही नृसिंह मूर्ती पाश्चिमाभिमुख असुन ती वालुकाशिलेची आहे. भक्त प्रल्हादाच्या प्रत्यक्ष उपासनेतील ही मूर्ती वीरासनस्थ ' जानुद्वय हितकर ' म्हणजे दोन्ही मांडयावर हात ठेवलेल्या स्थितीत समोरील मंदिरातील प्रल्हादाकडे आणि दर्शनासाठी अनन्य भावाने येणा-या भक्ताकडे कनवाळू दृष्टीने पाहत आहे असे वाटते. या वीरासनस्थ मूर्तीचा उजवा पाय गुडघ्यात मुडपलेला तर डाव्या पायाची मांडी घातलेली असून मूर्तीची चर्या उग्र आहे. कमर बारीक, छाती रुंद, सिंह सदृष्य बसकट नाक, रुंद जबडा आणि तीक्ष्ण दृष्टी असे या मूर्तीचे मूळ स्वरुप आहे. मूर्ती वालूकाशिलेची असल्याने वर्षानुवर्षे दैनंदिन होणा-या पंचामृत अभिषेकामुळे सुक्ष्म झालेली आहे. मूर्तीच्या संरक्षणासाठी औषधी वनस्पतीचा वज्रलेप केला आहे. आता फक्त श्रीमूर्तीच्या चांदीच्या पादुकावरच अभिषेक होतो.



## सोलापुर जिल्हा -

भारतातील महाराष्ट्र राज्यामधील सोलापुर जिल्हा हा एक महत्वाचा जिल्हा आहे.हॅंड्लूम, पॉवरलूम, चादर वविडी उद्योगांसाठी तो प्रसिद्ध आहे. राज्याच्या राजधानीचे ठिकाण , मुंबई पासुन तो ४१० कि.मी. इतक्या अंतरावर असून तो मुंबई -चेन्नई व मुंबई- हैद्राबाद या प्रमुख रेल्वेमार्गावर आहे. पुण्यापासून २४५कि.मी. व हैद्राबादपासून ३०५ कि. मी. अंतरावर असून NH-9,NH-13,NH-211हे राष्ट्रीय महामार्ग सोलापुरातून जातात.जिल्हयात एकूण ११तालुके असून तो पुर्वेला उस्मानाबाद, गुलबर्गा (कर्नाटक) दक्षिणेला सांगली, विजापुर (कर्नाटक) आणि पश्चिमेला पुणे आणि सातारा या जिल्ह्यांनी वेढलेला आहे.